❑ मुख्य संपादक ❑
अरविंद भंडारे

❑ संपादकीय मंडळ ❑
दिलीप सावंत, विशाल मोरे
रोहीणी जुवाटकर - भंडारे
शांतारामजी इंगळे, देवदत्त कांबळे
जगन्नाथ काळे

❑विधी सल्लागार ❑
अनिल वैद्य (माजी न्यायाधिश)

❑प्रकाशक ❑
पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई

❑सल्लागार मंडळ❑
नागसेन गमरे, अरुण वाघमारे,
अरुण साळुंके, रॉकेश यादव,
रामचंद्र सकपाळ, विश्वास सरोदे, प्रमोद पोळ

❑संपादकीय पत्रव्यवहार❑
अरविंद भंडारे
५४/७८, बी. डी. डी. चाळ,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.
भ्रमणध्वनी: ९९६७६९२०१४

हे त्रैमासिक पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई यांनी खाजगी वितरणाकरीता छापून **पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई** ५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - ४०० ०१८. येथून प्रसिद्ध केले. या **त्रैमासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

**किंमत रु. ४०/-**
**वार्षिक वर्गणी रु. १६०/-**
**पंचवार्षिक वर्गणी रु. ८००/-**
**आजन्म वर्गणी रु. ५०००/-**

**❑ मुखपृष्ठ सजावट ❑**
अमोल सुर्यकांत कांबळे

**❑अक्षर जुळणी❑**
पी.सी.मॅन कॅम्प्युटर,
दादर

*पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई चे मुखपत्र*

# बुद्धसासन

**त्रैमासिक, मराठी**

वर्ष ४ थे, अंक १३ वे, जुलै ते डिसेंबर २०२१ बुद्धाब्द २५६४-६५

## अनुक्रमणिका

◆ संपादकिय 3

◆ निचिरेन् : जपानी बौद्ध संत 6
**– डॉ. भरतसिंह उपाध्याय**

◆ प्रगतीचे सात नियम 11
**– राजेश चंद्रा**

◆ राहुलमाता यशोधरा 16
**– मधुकर पिपलायन**

◆ धार्मिक दृष्टिकोनातून शहरांची उत्पत्ति आणि विकासमहाबोधी मंदिर बोधगया च्या विशेष संदर्भात 18
**– डॉ. निर्मला आणि डॉ. भिखारी राम यादव**

◆ बुद्ध धम्मातिल आठ अद्भुत गुण 23
**– उपासिका : आर. तुलि**

◆ धर्म (धम्म) आणि समाज 26
**– उपासिका : आर. तुलि**

◆ भेसज्जगुरु 31
**- अरविंद भंडारे**

### वर्गणीदारांना विशेष सुचना

वार्षिक वर्गणी/आजन्म वर्गणी - पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई ५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - १८ या पत्त्यावर मनिऑर्डरने किंवा बँक खात्यावर जमा करु शकता.

**Bank Name** : ABHYUDAYA CO. OP. BANK LTD.
**ACCOUNT NAME** : PALI RESEARCH INSTITUTE MUMBAI
**AC NO.** : 013011100064813
**BRANCH** : WORLI
**IFSC CODE** : ABHY0065013
**GOOGLE PAY NO.**: 9967692014

वर्गणीदारांना अंक स्पीड पोस्टने घरपोच हवा असल्यास संपादकांना फोन करुन स्पीड पोस्ट चार्जेस विचारुन पाठविणे. वर्गणीदारांनी नुतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठविताना आम्हांस सूचित करावे.

# पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा

पालि भाषेचा प्रचार व प्रसार जन सामान्यांपर्यंत व्हावा या सद्हेतूने स्थापन झालेल्या पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबईच्या वतीने दोन दिवसांची पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा वेगवेगळ्या शहरात/ गावात घेतली जाणार आहे. तरी पालि भाषा व ब्राह्मी लिपी प्रेमी यांनी या सुवर्णसंधीचा अवश्य फायदा घ्यावा. कार्य शाळेची फी नाममात्र असेल.

अधिक माहितीसाठी खालील भ्रमणध्वनीद्वारे किंवा ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

Email : paliresearchinstitute@gmail.com
Web : www.paliresearchinstitute.com
**अरविंद भंडारे - ९९६७६९२०१४**

प्रिय, जाहिरातदार,

सप्रेम जय भिम,

उपरोक्त संस्थेच्या वतीने पालिभाषेचा पर्यायाने बौद्ध धम्माचा प्रचार सर्वसामान्यांपर्यंत व्हावा. या हेतुनें बुद्धसासन नावाचे त्रैमासिक सुरू केले आहे. हे त्रैमासिक पालि भाषेचा, बौद्ध धम्माचा इतिहास, आदर्श संस्कृती, कला, वाङ्‌मय व तत्वज्ञान इत्यादिंना संपूर्ण वाहिलेले आहे. तसेच त्यात महिला व तरूण यांच्यासाठी वेगळे सदर असतील. आपल्या सारख्या सामाजिक बांधिलकी मानणाऱ्यांनी या त्रैमासिकात आपली जाहिरात प्रसिद्ध करून व वार्षिक/आजन्म सभासद बनून समाज प्रबोधनाच्या या कार्यात सहभागी व्हावे हीच आपणांस नम्र विनंती.

आपण जाहिरात देऊन या पवित्र कामास हातभार लावाल ही खात्री आहे.

**जाहिरातीचे दर खालीलप्रमाणे आहेत.**

| पान | दर रूपये |
|---|---|
| मुखपृष्ठ बाहेरील (रंगीत ) | ४,०००/- |
| मलपृष्ठ आतील (रंगीत ) | ३,०००/- |
| संपूर्ण आतील पान | २,०००/- |
| अर्धे पान | १,०००/- |
| पाव पान | ५००/- |

**आपला धम्मबंधू**
**संपादक**

**त्रैमासिकासाठी**

| | | |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | :- | राजेश चन्द्रा, लखनौ - ९४१५५६५६३३ |
| बिहार | :- | भिक्खु प्रग्यादिप महाथेरो, अखिल भारतीय भिक्खु संघ विहार - ९४७०८५२०७८ |
| मध्यप्रदेश | :- | रामानंद जाधव - ९०९८३०८४०४, जे. पी. पेठारी - ९७५२७५९८७९ |
| नागपुर | :- | महानागरत्न - ८२७५९२११८५ |
| मलकापुर, बुलढाणा | :- | शांतारामजी इंगळे - ९९६०७९६८२७ |
| मुंबई | :- | अरविंद भंडारे - ९९६७६९२०१४ |
| गुजरात | :- | अनिलकुमार पाटील, अहमदाबाद - ९७२५५०५४२२ |

## संपादकिय

# धम्मचक्र प्रवर्तन

**चार धम्म सत्य:-**

धम्मचक्क पवत्तन सुत्तात भगवान बुद्धांनी ज्ञान प्राप्तिनंतर जे प्रथम प्रवचन दिले त्यात चार आर्य सत्यांचे वर्णन आहे. ज्याचा त्यांना बोध झाला. धम्मचक्क पवत्तन सुत्तात चार आर्य सत्यांचे विश्लेषणआहे. धम्मचक्क पवत्तन सुत्तात भगवान बुद्धांच्या शिकवणुकीचा सार आहे. हे असे सुत्त आहे ज्यात सर्वकाही आहे जे धम्म व ज्ञान समजण्याकरिता पुरेसे आहे.

असे म्हटले जाते की ज्या बोधिवृक्षाखाली तथागत बुद्धांनी ज्ञान प्राप्त केले तेथे ज्ञानप्राप्ती नंतर त्यांनी विचार केला की जे ज्ञान मी प्राप्त केले आहे, ज्या दिव्य घटनेचा मी अनुभव केला आहे ते इतके सूक्ष्म आहे की ते शब्दांत सांगणे कठीण आहे. त्यांनी विचार केला की जे मी प्राप्त केले आहे ते इतके सूक्ष्म आहे की, ते शब्दांत सांगणे कठीण आहे. ते सहज शिकवण्यासारखे नाही. अंतत: मी निशब्द शांत राहीन. मी जे प्राप्त केले आहे ते स्वानुभावतूनच समजले जाऊ शकते. अंतत: बाकीच्या जिवनात कोणासही काहीही न सांगता बोधिवृक्षाखाली बसून राहीन. एकटाच चारिका करेन. भगवान बुद्धांच्या मनात हे विचार सुरु असतानाच ब्रह्म-सहंपती भगवान बुद्धांजवळ आले व त्यांना याचना करुन त्यांचे मनपरिवर्तन केले की त्यांनी त्यांचे ज्ञान जनसामान्यांत उपदेशित करायला हवे. ब्रह्म सहंपती ने भगवान बुद्धांना विनंती केली की या जगात असे ही लोक आहेत जे आपली शिकवण/उपदेश समजू शकतात. फक्त त्यांच्या डोळ्यात अज्ञानाची धूळ जमा आहे इतकीच.

ब्रह्म सहंपतीचे म्हणणे मान्य करुन भगवान बुद्धांनी बोध-गयेतून वाराणसीकडे प्रस्थान केले. मार्गात त्यांना एक तपस्वी साधू भेटला. तो भगवान बुद्धांच्या व्यक्तित्वाशी प्रभावित होऊन त्याने भगवान बुद्धांना विचारले हे तपस्वी, असे तुम्ही काय प्राप्त केले ज्यामुळे आपल्या शरीरातून प्रकाशाची तेजस्वी किरणे बाहेर पडत आहेत? भगवान बुद्धांनी उत्तर दिले. 'मला बुद्धत्वाची प्रप्ति झाली आहे. मी अर्हत आहे, मी बुद्ध आहे'.

त्या साधूने विचार केला की, कठीण तपस्येमुळे हा स्वत:ला खूप मोठा समझू लागला आहे. स्वत:ला बुद्ध समजू लागला आहे व तसेच पुढे चालू लागला. त्यानंतर भगवान बुद्ध वाराणसी येथील मृगदाय वनात गेले जेथे त्यांचे पूर्वीचे सोबती होते त्यांचे पूर्वीचे सोबती ऋद्धावान होते, परंतु बुद्धांना बुद्धत्व प्राप्तीपूर्वी त्यांनी खीर ग्रहण करताना पाहिले तेव्हा त्यांनी असा विचार केला की सिद्धार्थ गौतमाने व्रताचे पालन केले नाही ते अपवित्र झाले, पथभ्रष्ट झाले व त्यांचे सोबताी त्यांना तेथेच सोडून निघून गेले. यानंतरच भगवान बुद्धांना बोधिवृक्षाखाली ध्यान करुन ज्ञानप्राप्ती करुन घेण्याची संधी मिळाली.

बुद्धत्व प्राप्ती नंतर भगवान बुद्धांनी विचार केला की जर माझे गुरु आलारकालाम व उद्दक रामपुत्त आज जिवंत असते तर सर्वप्रथम मी त्यांना धम्मोपदेश दिला असता. त्यांनी धम्माला तात्काळ जाणले असते. ते पंडीत होते, चतुर होते, मेधावी होते. त्यानंतर भगवान बुद्धांना त्यांच्या पूर्वीच्या सोबत्यांची आठवण झाली ज्यांनी साधनेत असताना भगवान बुद्धांची सेवा केली होती तेच सोबती ह्या ज्ञानाचे अधिकारी आहेत, जे मला व्रत त्यागल्यामुळे सोडून वाराणसी येथे गेले होते.

भगवान बुद्ध वाराणसी येथे आपल्या सोबत्यांकडे येत असता प्रथम तर त्यांनी ध्यान दिले नाही. त्यांना पाहून न पाहिल्यासारखे केले. परंतु जसे जसे ते जवळ येऊ लागले तसे त्यांच्या व्यक्तित्वाकडे पाहून ते पाहतच राहिले. त्यांच्या स्वागतासाठी त्यांना आसन देऊन त्यांचा योग्य तो सन्मान केला. भगवान बुद्धांनी त्यांना जो प्रथम उपदेश दिला तो त्यांची शंका मिटवण्याकरिता दिला होता. ज्याकारणाने ते तथागतांना सोडून गेले होते.

भगवान बुद्ध म्हणाले, 'भिक्खूंनो, दोन अतिं ना सोडा, दोन अतिं चे सेवन करणे अनर्थ आहे,' अज्ञानता आहे जसे की काम सुखात आसक्त होणे, शरीराला अति पीडा व कष्ट देणे. या दोन अतिं ना सोडून मी मध्यम मार्ग शोधला आहे जो दृष्टी देणारा आहे, शांति देणारा आहे, ज्ञान देणारा आहे, आनन्द देणारा आहे मध्यम मार्गच आर्य अष्टांगिक मार्ग आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वचन, सम्यक कर्म, सम्यक आजिविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृति आणि सम्यक समाधि.

भगवान बुद्धांनी आपल्या सोबत्यांना चार आर्य सत्यांवर प्रवचन दिले. चार आर्य सत्यांचे ज्ञान करविले. त्यांनी सांगितले की दु:ख आहे व दु:खाचे कारण आहे. दु:ख निरोध आहे व दु:ख निरोधाचा उपाय आहे. याप्रकारे भगवान बुद्धांचे पाहिले प्रवचन त्यांच्यासाठी होते ज्यांच्या डोळ्यांत अजूनपर्यंत धूळ जमा होती.

**चार आर्य सत्य**

1) दु:ख 2) दु:खाचे कारण आहे

3) दु:ख निरोध 4) दु:ख निरोधाचा मार्ग

दु:खाची व्याख्या करताना भगवान बुद्ध म्हणतात, 'जन्म दु:ख आहे. जरा दु:ख आहे, मरण, शोक, रुदन, मनाची बेचैनता दु:ख आहे. प्रिय व्यक्तीचा वियोग दु:ख आहे. अप्रियांची सोबत दु:ख आहे. इच्छा करुन देखील जे मिळालं नाही ते दु:ख आहे.

दु:खाचा हेतु आहे, दु:खाचे कारण आहे. तृष्णा, वासना, काम भोगाची तृष्णा उत्पन्न करतात. सांसरिक पदार्थाच्या तृष्णेमुळेच संसारात भांडण तंटे आहेत. राजा राजांसह लढतात, ब्राह्मण ब्राह्मणांसह लढतात. माता पुत्रासह, पुत्र मातेशी, भाऊ भावासह, पिता पुत्रासह, पुत्र पितासह, भाऊ बहिणीशी बहिण भावांशी, मित्र मित्रासह याप्रकारे कलह विवाद करत एकमेकांवर आक्रमण करत महान दु:खाला प्रापत होतात.

दु:खाचे निवारण - इच्छा, तृष्णा, वासना हेच दु:खाचे मूळ कारण आहे. इच्छा, तृष्णा, वासना यांना आपल्यात प्रवेश करु देऊ नये. इच्छा, तृष्णा वासनेचा नाश करावयास हवा. सांसारिक पदार्थापासून, सांसारिक विचारांपासून जेव्हा तृष्णा नष्ट होते तेव्हा तृष्णेचा अंत होतो. तृष्णेच्या अंतासह दु:खाचा अंत होतो.

बाहेरील सांसारिक लोभापायी स्वत:ला भटकू देऊ नये. सांसारिक व्यक्ति, सांसारिक पदार्थांना प्राप्त करण्यास तसेच पद, प्रतिष्ठा कमावण्यात व्यस्त आहे. ज्यामुळे तृष्णा आणखी वाढते. तृष्णेचा अंत नाही. तृष्णाच दु:खाचा स्त्रोत आहे. इच्छा, शक्ति वासनेत आसक्त होणे त्यात गुरफटणेच दु:ख आहे. तृष्णेच्या नष्ट होण्याने पुनर्जन्माचा निरोध होतो. जन्माच्या निरोधामुळे जरा, मरण, शोक, रुदन, मनाची अशांति नष्ट होते. याप्रकारे दु:खाचा अंत होतो.

भगवान बुद्ध म्हणतात, 'जो जन्माला आलाय तो मृत्यु पावणार. ज्याचा प्रारम्भ आहे त्याचा अंत देखील आहे. ज्याचा उदय आहे त्याचा अस्त देखील आहे. जे बनले आहे ते तूटणार देखील. हाच निसर्गाचा नियम आहे. हेच शाश्वत सत्य आहे. अत: नियमाबाहेर राहुन आसक्त होण्यातच दु:ख आहे. नियमांचे पालन केल्याने दु:खाचा अंत आहे'.

पुढे म्हणतात, 'संसारात सर्व अनित्य आहे, अनित्य वस्तुच्या आसक्तित दु:ख आहे'.

दु:ख निवारणाचा मार्ग आहे आर्य अष्टांगिक मार्ग - सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक जिवीका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृति, सम्यक समाधी.

**सम्यक दृष्टी** - मनाने, वाचेने, शरीराने चांगल्या वाईट गोष्टींचे ज्ञान म्हणजे सम्यक दृष्टी प्राप्त होते तेव्हा आपण आपल्या बुद्धिमत्तेचा योग्य वापर करतो आपणास चांगले वाईटाचे ज्ञान होते. ते विचार जे आपणामध्ये शांति उत्पन्न करतात ते शुद्ध आहेत. जे विचार अशांति उत्पन्न करतात ते आपल्या स्वत:च्या विचारांशी जोडलेले असतात. लोभ, द्वेष, मोह, अहंकार यांच्यासह जोडलेले विचार आपल्या स्वत:च्या पूर्ततेशी जोडलेले विकार आहेत. ज्यामुळे दु:ख उत्पन्न होते.

दु:ख का आहे? पिडा का आहे? सुखच सुख का नाही? संसारात इतके दु:ख का? कष्ट का ? असे व्हायला नको. ज्यांच्यावर आपण प्रेम करतो. ते मृत्यूला प्राप्त होतात. त्यांच्या वियोगाने आपणास असह्य यातना होतात याप्रकारे विचार करणे धम्म नाही. धम्म हेच सांगतो हा निसर्गाचा नियम आहे. हे असेच असते आपल्याला ते समजून घेऊन त्यानुसार आपल्या विचारांचा विकास करावयाचा आहे. आपल्या मनचित्ताला बदलायचे आहे. जिथे आपला स्वार्थ आडवा येतो तिथे आपली दृष्टी आपला समझूतदारपणा निष्प्रभ ठरतो. चूक ठरतो. आपले मन दु:खी होते. आपण एकमेकांना दोषी ठरवतो. ज्यामुळे आपली समस्या आणखी वाढत जाते व जटील होते. आपण आपल्या बुद्धीचा उपयोग करुन जागृत होऊन, चैतन्याने आपल्या समस्यांचे समाधान करावयास हवे. भगवान बुद्ध म्हणतात, धम्माला जाणण्याचा हाच एकमात्र उपाय आहे की स्वत:ला जाणण्याचा प्रयत्न केला पाहिले. आपल्या विकारांना, आपल्या दूषित भावनांना दूषित विचारांना जाणण्याचा समजण्याचा प्रयत्न केला पाहिले. समस्यांचे निवारण होईल. समस्या आपोआपच सुटतील. हीच सम्यक दृष्टी आहे.

**सम्यक संकल्प (संकल्प)** - सम्यक विचार, सम्यक विचारांना आपल्या ह्रदयात, मनात उतरवणे. राग, हिंसा, प्रतिहिंसारहित होऊन विचार करणे. तृष्णा अज्ञानाने उत्पन्न होते, ज्ञानाने नव्हे सम्यक दृष्टीमुळेच सम्यक संकल्प निर्माण होतो.

बाहेरच्या जगातील चमक धमक आपण पाहतो आपल्यात तृष्णा उत्पन्न होते आपल्याकडे सुंदर घर, सुंदर वाहन, सुंदर पत्नी, हुशार व प्रिय मुलं, धन, प्रतिष्ठा इत्यादि असावे अश्याप्रकारची तृष्णा. जेव्हा या गोष्टी आपणाकडे नसतात तेव्हा आपणामध्ये

तृष्णा उत्पन्न होते. ह्या गोष्टी आपणाकडे असून देखील आपण संतुष्ट नसतो. आपली तृष्णा आणखी वाढते व वाढत जाते ज्याचा अंत नसतो.

वस्तुत: असेच होते की जे सत्य आहे त्याकडे आपण दुर्लक्ष करतो आणि जे असत्य आहे त्याकडेच आपण गंभीरतेने लक्ष देतो. ज्यामुळे दु:ख उत्पन्न होते. सम्यक संकल्प आपण विकसित करु शकतो. ध्यानाच्या सरावाने, ध्यान भावनेच्या अभ्यासाने **सम्यक वाचा, सम्यक कर्मान्त, सम्यक जिविका** विकसीत होते. कटू वचन बोलू नये. वेळ स्थान व संधी पहून जागरुक राहून. खोटे बोलू नये, निंदा, चुगली करु नये, असे शब्द बोलू नये ज्याने दुसऱ्यांच्या भावना दुखावल्या जातील. सत्य बोलावे, मधुर बोलावे जे ऐकून दुसरे प्रसन्न आणि स्वत: आनंदित व्हावे.

आपण जे बोलतो व करतो त्याकरिता आपण स्वत: जबाबदार असतो. जर का आपण जागरुक नसू तर आपण स्वत:ला दु:खी करतो व करतच जातो. जर कटू वचन बोललो तर त्याचे परिणाम वाईटच होणार. त्यासाठी आपण स्वयं जबाबदार आहे. याप्रकारे आपण स्वयं आपल्या कर्म बंधनात बांधले जातो. जेव्हा आपण पाहतो एखादा व्यक्ति पडला आहे त्याचवेळी आपल्यामध्ये धम्म जागृत होतो व आपण त्याला तात्काळ उचलतो. त्यावेळी आपल्या मनात कोणताही स्वार्थ नसतो. त्याबदल्यात काहीही अपेक्षा नसतात. आपल्यात करुणा आहे. दया भाव आहे व त्या व्यक्तिस उचलून आधार देऊन आपण आनन्द अनुभव करतो, मनात आंतरिक संतोष असतो हीच सम्यक समज आहे, सम्यक कर्म आहे व धर्म आहे. यामुळे आपण कर्मात बांधले जात नाही. परंतु हेच कर्म स्वार्थाने काही प्राप्तीच्या उद्देशाने वा आपली प्रशंसा होईल किंवा बक्षीस मिळेल या भावनेने करतो तेव्हा आपण आपले कर्म बनवितो. जेव्हा आपण जागरुक राहून निस्वार्थ भावाने, बुद्धिपूर्वक चांगले कर्म करतो तेव्हा आपण आपले कर्म बनवत नाही. हाच धर्माचा (धम्माचा) मार्ग आहे.

**सम्यक आजिविका:-** सदाचाराने केलेली कमाई ईमानदारीने कमावलेल्या धनाने जीवनयापन करणे. सम्यक आजिविकेसाठी आपण लक्षात घेतले पाहिले की त्यामुळे कोणत्याही प्रकारची हिंसा होता कामा नये. कोणासही कोणत्याही प्रकारे हानी पोहचता कामा नये. कोणाचेही शोषण होता कामा नये. मदय, विष, नशेचा व्यापार समाजाला हानी पोहचवतात यापासून दूर, विरत राहावयास हवे.

याप्रकारे सम्यक दृष्टी, सम्यक समजातूनच सम्यक वचन, सम्यक कर्म, सम्यक जिवीका ओळखली जाते. सम्यक कर्म करुनच आपणच अनुभवू शकतो की आपल्यावर यामुळे आशिर्वादाचा वर्षाव होतो.

**सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृति, सम्यक समाधी** याचा संबंध आपल्या अंतर्मनाशीच आहे, ह्दयाशी आहे. जेव्हा आपण आत्म संबंधी विचार करतो तेव्हा आपणास जाणवते की आपल्या ह्दयात प्रज्ञा (शिर), शील (शरीर), समाधि (ह्दय) हे तिन्ही परस्परांशी जोडलेले आहे, हे तिन्ही एकत्रितपणे कार्य करतात. तेव्हाच आपल्याला अनुभवाची प्राप्ति होते.

इंद्रियांवर संयम, अकुशल अविचारांना रोकणे, कुशल विचारांना विकसित करणे व सदा स्मरणात ठेवणे की सर्व अनित्य आहे. क्षणभंगुर आहे. नाशवंत आहे. अंतत: मन, शरीर आणि चित्ताच्या धर्माला समजणे.

सम्यक दृष्टी, सम्यक अंडरस्टॅडींग, सम्यक विचार हे बौद्धिक आहे. सदाचार नैतिकता म्हणजेच सम्यक वचन, सम्यक कर्मान्त, सम्यक आजिविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृति व सम्यक समाधि आहे. हे सर्व एकमेकांवर आधारित आहे. एक दुसऱ्याशी संबंधित आहे. हे आपल्या भावनांना, मनाला सन्तुलित करण्यास सहाय्यक आहेत. जेव्हा आपले मन संतुलित होते, आपल्या भावना संतुलित होतात तेव्हा आपल्या मनात आंतरिक आनंद व शांतीचा अनुभव होतो. हाच मध्यम मार्ग आहे. दोन अतिंच्या मधला मार्ग आहे. यामुळे आपली बुद्धि, आपले इंद्रिय व आपल्या भावना यामध्ये संतुलन राहते. परमोच्च आनंद राहतो. आर्य अष्टांगिक मार्गावर चालण्याने आपल्या मनात गहन शांति व निर्भयतेचा विकास होतो. आर्य आष्टांगिक मार्गावर चालूनच आपल्या खऱ्या आनंदाचा व सुखाचा अनुभव घेता येतो.

म्हटले जाते की, ब्रह्म, इंद्र इत्यादि देवतांनी सुद्धा धम्म उपदेश ऐकून आनंदित होऊन हर्ष ध्वनि करु लागले, साधूवाद देऊ लागले व आल्हादित होऊन म्हणाले, धम्म चक्र गतिमान झाले. याप्रकारे भगवंतांनी संसारात धम्म चक्र प्रवर्तन करुन धर्माची स्थापना केली.

**उपासिका आर. तुलि**

मराठी अनुवाद

**– अरविंद भंडारे**

## निचिरेन् : जपानी बौद्ध संत

**डॉ. भरतसिंह उपाध्याय**

जपानी लोकांची परंपरागत धारणा आहे की, बौद्ध धर्माचा विकास हा त्यांच्या क्रमश: तीन रुपांमध्ये झाला आहे. यातलं पहिलं रुप आहे ज्याला ते परिपूर्ण धर्म म्हणतात. भगवान बुद्धांच्या परिनिर्वाणानंतर एक हजार वर्षापर्यंत त्यांचे शिष्य व प्रशिष्य यांनी धर्माच्या सर्वांगीण रुपाचे पालन केले. त्यांच्या जीवनात परिपूर्ण ब्रह्मचर्याच प्रकाशमान होत होती. याच्यानंतर **'अनुकृत धर्मा'** चे युग आले. या युगामध्ये लोकांनी धर्माच आचरण न करता फक्त अनुकरण केलं. चैत्य आणि विहारांची निर्मिती याच युगामध्ये केली गेली. 'अनुकृत धर्मा' च युग एक हजार वर्षापर्यंत चाललं. यानंतर परिवर्ती धर्म युग आलं. या युगाचा कालावधी दहा हजार वर्ष इतका आहे. जो अजूनही चालूच आहे. हे युग धर्म आणि नितीच्या आत्यंतिक ऱ्हासाचे आहे. जपानी परंपरेनुसार भगवान बुद्धांचे परिनिर्वाण इ.स. पूर्व 949 मध्ये झालेलं आहे आणि त्यात दोन हजार वर्ष जोडली तर इ.स. 1052 हे त्यांच्या मतानुसार **'परिवर्ती धर्म'** च्या आरंभाचा काळ आहे. ही तिथी भारतातही येणाऱ्या भय आशंकांची सूचना घेऊन आली होती, हे या परंपरेतील इतिहासकारांचे सामान्य मत आहे.

जपानमध्ये इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या मध्यात बौद्ध धर्माच्या बरोबरीने सभ्यतेची सुरुवात झाली. भारत, चीन, कोरिया, जपान हाच इथे सद्धर्म पोहोचण्याचा क्रम होता. थोड्याच कालावधीत बौद्ध धर्म हा जपानचा 'राजधर्म' बनला आणि जनतेच्या मनात धर्माची मूळं रुजली. इ. स. पूर्व 500 ते इ.स. 300 पासून ते इ.स. 1000 पर्यंत बौद्ध धर्माचे व्यवस्थित स्वरुपात संघटन होऊन अनेक संप्रदाय उत्पन्न झाले. 11 वे आणि 12 वे शतक हे सांप्रदायिक वाद-विवादांकरीता प्रसिद्ध आहे. या काळात बौद्ध धर्मात नैतिक ऱ्हासाची लक्षणे दिसू लागली. या काळापर्यंत जपानमध्ये मुख्य बौद्ध संप्रदाय उत्पन्न झाले होते. हे संप्रदाय चार होते.

1) **'शिंइ-गोन्'** संप्रदाय जो गूढ मंत्रवादी संप्रदाय होता. याची तुलना भारतीय वज्रयानी बौद्ध धर्मा बरोबर केली जाऊ शकते. हा तांत्रिक बौद्ध धर्माचे एक रुप होता.

2) **जो दो** संप्रदाय म्हणजेच सुखावती संप्रदाय जो अमिताभ बुद्धांची उपासना आणि अमिताभ बुद्ध (जपानी अमित बुत्सु) याचा नामजप करुन मुक्ती संभव आहे असे मानणारा होता. **'सुखावती'** नावावरुन या संप्रदायाने स्वर्गलोकाची स्वत:ची अशी कल्पना केली होती.

3) 'रित्सु' संप्रदाय हा संप्रदाय विनय संबंधी नियमांचे पालन करण्यावर भर देत होता, परंतु यात केवळ एक बाह्य कर्मकांड शेष राहीले होते.

4) 'जेन्' संप्रदाय, ज्याला जपान मधील ध्यानी बौद्ध संप्रदाय म्हटले जाऊ शकते. (म्हणता येईल) जपानी शब्द 'जेन्' हा पाली भाषेतील 'ज्ञान' या शब्दांचे विकृत रुप आहे, ज्याचे संस्कृत प्रतिरुप ध्यान असे आहे. हा संप्रदाय ध्यानाला अधिक महत्व देत होता आणि 'लंकावतार सूत्र' हा त्यांचा प्रमुख ग्रंथ होता. सामाजिक परिस्थिती खूप बिघडलेली होती आणि राजनैतिक परिस्थिती हालाखीची होती. राजसत्ता ही काही मोजक्या सैनिक अधिकाऱ्यांच्या हातात गेली होती. तेराव्या शतकाच्या आरंभ काळात भारताप्रमाणेच जपानवरही मंगोलियनांचे आक्रमण व्हायला सुरुवात झाली होती. जपानी इतिहासाची ही पार्श्वभूमी समजून घेण्याकरीता आपल्याला जपानच्या तेराव्या शतकातील प्रसिद्ध संत आणि सुधारक महात्मा निचिरेन् यांचे जीवन आणि कार्य समजुन घ्यायला हवे.

महात्मा निचिरेन् यांचा जन्म 30 मार्च इ.स. 1222 मध्ये दक्षिण-पूर्व जपान मधील एका द्विपावर झाला. त्यांचे वडील एक गरीब मच्छीमार होते. निचिरेन् अकरा वर्षांचे असताना शिक्षणाकरीता त्यांना जवळच्या एका बौद्ध मठात पाठवले गेले. ते पंधरा वर्षांचे असताना त्यांना श्रामणेर म्हणून दीक्षा दिली गेली. याच वयात त्यांना खरी बुद्ध शिक्षा काय आहे, प्रचलित मतांमधील सत्यता काय आहे हे जाणून निर्णय घेणे तसेच बुद्धत्वाचा साक्षात्कार करण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. याकरीता अध्ययन शोध आणि साधना यांची जी आवश्यकता होती ती त्यांनी पूर्ण केली. ध्यान केलं, अमित बुद्धांचा नामजप केला परंतु शांती मिळाली नाही. आपल्या त्यावेळच्या अवस्थेचं वर्णन करताना त्यांनी लिहीलयं, "माझी नेहमीच ही इच्छा होती की बुद्धत्व प्राप्तीकरीता बीज रुजवून जन्म मरणाच्या बंधनातून मुक्ती प्राप्त करेन." या उद्देशाच्या प्राप्तीकरीता मी माझ्या अनेक बौद्ध बांधवांप्रमाणे अमित बुद्धांच्या नावाचा श्रद्धापूर्वक जप केला. परंतु थोड्याच दिवसात साशंक होऊन मी निश्चय केला की, जपान मध्ये बौद्ध धर्माच्या जितक्या शाखा प्रचलित आहेत त्या सर्वांचे अध्ययन करेन आणि त्यांच्या विभिन्न सिद्धांतांना चांगल्या प्रकारे आत्मसात करेन. बुद्धांचे स्वताचे काय मत होते हे त्यांना प्रचलित बौद्ध धर्माच्या विभिन्न रुपांमधून शोधायचे होते.

बौद्ध धर्माचे मूळ रुप काय आहे? शाक्यमुनि ने शिकविलेल्या सत्याचे मौलिक रुप काय आहे? याच शोधार्थ निचिरेन् यांची विचारधारा चौफेर घुमत होती त्यांना जसजसा

सत्याचा शोध लागत होता तसं त्यांना निश्चित होत होतं की सत्य एकच आहे. केवळ बौद्धधर्मातच नाही तर मानवी जीवनाच्या तत्वातही विभिन्नता नाही हे व्यक्त करताना त्यांनी लिहीलंय की बौद्ध धर्माचं सत्य काय आहे, या शोधार्थ मी वीस वर्ष बौद्ध धर्माच्या अनेक केंद्रांमध्ये फिरत राहिलो. शेवटी मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलोय की, बौद्ध धर्माचे सत्य एकच असले पाहिजे. याप्रकारे शोध आणि चिंतनात अजून दहा वर्षे सरली. तीन वर्षाच्या गहन चिंतनानंतर निचिरेन् यांना बोध झाला की त्यांना सत्य गोष्ट लक्षात आली आहे. एक दिवस विहाराच्या जवळच्या एका डोंगर माथ्यावरुन प्रशांत महासागराकडून उदयास येणाऱ्या बाल रविकडे नजर स्थित करुन ध्यानस्थ भिक्षूने पर्वताला आपल्या वाणीने शब्दबद्ध करत उच्चारण केल " "अर्थात नम सद्धर्मपुंडरीकाय" हाच महात्मा निचिरेन् यांचा संदेश होता, जो सूर्याला साक्षी मानून त्यांनी विश्वाला दिला. त्यांच्या या संदेशाचा काय अर्थ होता हा आपल्याला समजून घ्यायला हवा. वरील मंत्रात सद्धर्म पुंडरीक ला नमस्कार केला आहे, ज्याचे उच्चारण आणि अभ्यास महात्मा निचिरेन् आणि त्यांच्या अनुयायांकरीता एक महान धार्मिक कृत्य होतं सद्धर्म पुंडरीक (सद्धर्मरुपी कमल) एका संस्कृत ग्रंथात नाव आहे, ज्यात भगवान बुद्धांनी केलेल्या उपदेशांचा संग्रह आहे. हे उपदेश त्यांनी त्यांच्या जीवनातील शेवटच्या आठ वर्षांत गृद्धकूट नावाच्या पर्वतावर केले. या ग्रंथाचा चीनी भाषेतील अनुवाद प्रसिद्ध भारतीय आचार्य कुमारजीव यांनी इ.स. 407 मध्ये केला होता. कुमारजीव यांनी केलेल्या अनुवादा व्यतिरिक्त आणखी दोन अनुवाद जास्त प्रचलित होते. निचिरेन् यांनी हे सर्व अनुवाद पाहिले होते आणि त्यांना कुमारजीव यांनी केलेला अनुवाद अधिक आवडला होता. याच ग्रंथाचे अनुसरण करताना निचिरेन् यांना वास्तविक बुद्ध उपदेश हेतूचा अनुभव आला. ज्याची घोषणा त्यांनी अधिक महत्व दिलेल्या या सद्धर्मपुंडरीक याचे विषय वस्तू आणि विचारधारा काय आहे हे जाणून घेण्याची अनेक जणांची इच्छा असेल. या इच्छेची पूर्ण तृप्तता होणे इथे असंभव आहे, कारण संपूर्ण ग्रंथात 28 अध्याय आहेत आणि बौद्ध विश्लेषणात्मक दर्शन थोडक्यात समजणे आणि समजावणे सोपे नाही. तरीही असे म्हणणे आवश्यक आहे की या ग्रंथामध्ये भगवान शाक्यमुनींनी सूचित केलेल्या एकमात्र मार्गाचे वर्णन आहे, ज्याद्वारे भूतकाळातही बुद्धांनी ज्ञान प्राप्त केलं आहे आणि पुढेही प्राणीमात्र करतील. भगवान शाक्यमुनि यांच्या ऐतिहासिक व्यक्तित्वाला सार्वभौम धर्माचे साकार रुप देणं ही या ग्रंथाची एक मोठी विशेषता आहे. भगवान शाक्यमुनि सर्व काळात आणि सर्व देशांत विद्यमान आहेत, हे या ग्रंथाचे आश्वासनात्मक दर्शन आहे. जसे भगवान कृष्णाने गीतेमध्ये भक्तांकरीता आश्वासन दिले, तसेच इथे भगवान शाक्यमुनि देताना दिसून येतात. नैतिक उपदेशांनी संपूर्ण ग्रंथ भरलेला आहे. सद्धर्म पुंडरीक सूत्राचे मूळ संस्कृत रुपाचे संपादन सेंट पिटर्सबर्ग ने इ.स. 1912 मध्ये केला आहे. सेक्रेड बुक्स ऑफ दी ईस्ट ग्रंथमालेत (संख्या 21) याचा इंग्रजी अनुवादही प्रकाशित झाला आहे. ज्या ग्रंथाच्या पुण्य नामाला कमीत कमी 32 लाख जपानी (एकट्या निचिरेन् यांच्या अनुयायांची संख्या) प्रतिदीन नमस्कार करतात आणि नामजप करतात, त्याचा आणि त्याच्यासारख्या शेकडो ग्रंथांच्या संपादन अथवा अनुवादाची आवश्यकता आजपर्यंत भारत भूमित अनुभवली गेली नाही. हो आशियातील देशांवर आपल्या सांस्कृतिक विजयाच्या गोष्टी करताना आम्ही खरंच थकत नाही.

सद्धर्मपुंडरीक हा निचिरेन् यांच्याकरीता केवळ एक ग्रंथ नव्हता. सद्धर्मपुंडरीक यांना नमस्कार करण्याचे तात्पर्य म्हणजे परिपूर्ण सत्याला नमस्कार करणे जे तिथे प्रकट झाले होते. या विषया संदर्भात आपली भावना प्रकट करताना ते लिहितात, "या धर्मग्रंथातील सर्व अक्षरे भगवान बुद्धांचे जीवंत शरीर आहे, जे त्यांनी परिपूर्ण ज्ञान अवस्थेत प्रकट केले आहे. हे तर आपले चर्मचक्षु आहेत, ज्यांना इथे फक्त अक्षर दिसून येतात जसं प्रेतांना गंगाजलातही आग दिसते. कधी मनुष्य त्यात पाणी पाहतात आणि देव अमृत पाहतात. पाणी तर एकच आहे, परंतु प्रेत, मनुष्य आणि देवतांच्या विभिन्न कर्मांमुळे त्यांना त्यात वेगवेगळ्या वस्तू दिसतात याचप्रमाणे जे अंध आहेत ते या धर्म ग्रंथाच्या अक्षरांमध्ये काही पाहत नाहीत. मानवाच्या त्वचेचे डोळे यात केवळ अक्षर बघतात. जो शून्यवादाने तृप्त आहे तो यात केवळ शून्यवादच पाहतो, जसं की बोधिसत्व प्राणी (बुद्धत्वाचा शोध घेणारा साधक) यात गंभीर तर्कहीन सत्याला पाहतो आणि ज्याने ज्ञान प्राप्त केले आहे ते याच्या प्रत्येक अक्षरात भगवान शाक्यमुनिंचे स्वर्णिय शरीर पाहतात. या सखोल श्रद्धेच्या सहाय्याने सद्धर्मपुंडरीकातील समाविष्ट हेतूचा प्रचार करण्याचा निचिरेन् यांनी निश्चय केला. याकरीता त्यांना विरोध सहन करावा लागला. ज्या दिवशी सकाळी निचिरेन् यांनी सूर्याला साक्षी ठेवून 'नमो सद्धर्मपुंडरीकाय' अशी घोषणा केली त्याच दिवशी दुपारी त्यांनी भिक्षु आणि गृहस्थांच्या एका मोठ्या सभेत भाषण दिलं आणि प्रचलित संप्रदायांवर कठोर टिका केली. याचा परिणाम असा झाला की त्यांना त्याच सायंकाळी मठातून बाहेर काढलं गेलं. बहिष्कृत साधू ने कामाकुरा हे आपलं कार्यक्षेत्र बनवलं. कामाकुरा हे त्या काळातील सैनिकी अधिकाऱ्यांची राजधानी होती. त्यावेळी देशावर अनेक संकटांचा डोंगर

कोसळला होता. सैनिक शासनकर्त्यांमुळे लोक त्रस्त झाले होते. त्यातच वादळ, भूकंप, पूर, दुष्काळ, महामारी एका नंतर एक अशा सगळ्यांनी राष्ट्राच्या अडचणीत वाढ केली. भूकेने आणि रोगाने पिडलेली माणसे सर्वत्र दिसत होती. रस्ते प्रेतांनी भरले होते. शासनकर्त्यांची उदासिनता अक्षम्य होती. परंतु जनताही दु:खाचे मूळ कारण न जाणून वेगवेगळ्या देवता आणि पितरांच्या पूजनात मग्न होती. निचिरेन् यांना खूप दु:ख होत होतं. त्यांनी जनतेच्या दु:खांचे विश्लेषण करुन पाहिले की धर्माची विकृति हेच याचं मूळ कारण आहे. जनता आणि शासनकर्ते यांना समजावताना त्यांनी सत्य आणि देश संरक्षणाची स्थापना (रिश्शो-अनकोकु-रोन्) नावाची एक पुस्तिका लिहीली. या पुस्तकात शासनकर्त्यांना त्यांची कर्तव्य सुचविलेली आहेत आणि जनतेने तंत्र-मंत्र इ. अंधविश्वास सोडून भगवान शाक्यमुनि यांचा वास्तविक उपदेश, जो सद्धर्मपुंडरीक मध्ये व्यक्त झाला आहे, तो ग्रहण करण्याची प्रेरणा दिली आहे. निचिरेन् यांनी राष्ट्राला इशारा देताना म्हटलं की सर्व विपत्तीमध्ये विदेशी आक्रमण या एका विपत्तिचा अनुभव आपण अजून घेतला नाही. जेव्हा मी धर्म-ग्रंथात केलेली भविष्यवाणी वाचतो आणि आपल्या आजुबाजुला जगात पाहातो, तेव्हा मला हे मान्य करावे लागते की देवता आणि मानव यांचे मेंदू भ्रमित होताहेत. भूतकाळातील सगळी भविष्य कथन पूर्ण झाली आहेत. मग आपण हे म्हणण्याचे धाडस करु शकतो का, की पुढेही ही भविष्य कथन पूर्ण होणार नाहीत? शासनकर्ते आणि सुखवादी बौद्ध ज्यांचे निचिरेन् कट्टर समीक्षक होते. ते या स्वतंत्र शब्दांना ऐकण्यास तयार नव्हते. एका उन्मत्त समुहाने त्यांच्या झोपडीला आग लावली. सरकार ने ही निचिरेन् यांच्यावर शांति भंगाचा आरोप लावला आणि त्यांना इजू नावाच्या एका द्विपकल्पावर निर्वासित केले गेले. तिथे त्यांचं आयुष्य अनेक संकटांनी भरलेलं होतं. ते अनेक वेळा मृत्यूपासून वाचले. एका गरीब मच्छीमार आणि त्याची पत्नी यांनी निचिरेन् यांची खूप सेवा केली. त्याकरीता कृतज्ञता व्यक्त करताना निचिरेन् यांनी त्या दोघांना आपले पूर्व जन्मीचे माता-पिता म्हटलयं. इजू प्रायद्वीप च्या साध्या भोळ्या ग्रामिण जनतेवर निचिरेन् यांचा मोठा प्रभाव पडला आणि मोठ्या संख्येने त्यांचे अनुयायी तयार झाले. धर्मोपदेश करण्याकरीता सर्वत्र फिरताना स्वातंत्र्यवादी निचिरेन् यांना कधी कधी रात्र आश्रयहीन अवस्थेत काढावी लागली.

निचिरेन् यांना इजू प्रायद्वीप मध्ये निर्वासित होऊन तीन वर्षे पूर्ण होण्याआधीच सरकारी आज्ञेतुन मुक्त केलं गेलं. सरकारला आशा होती की निचिरेन् यांचा जोश कमी झाला असेल परंतु गोष्ट अशी घडली नाही. याचकाळात आणखी एक घटना घडली. इ.स. 1268 मध्ये मंगोल सम्राट कुबलाई खान याचा एक दूत जपानी सीमेवर उतरला आणि करदान किंवा भावी आक्रमण याची सूचना दिली. यासंबंधी निचिरेन यांनी आठ वर्षांपूर्वीच जपानी शासनकर्ते आणि जनतेला सूचित केले होते. आता कुबलाई खानचे दूत आल्यावर ते तडक कामाकुराला गेले आणि सरकारला स्पष्ट शब्दात म्हणाले, “आठ वर्षांपूर्वी मी दिलेल्या सूचनेचे स्मरण करा. काय ती आता पूर्ण होत नाहीये?” निचिरेन् व्यतिरिक्त आणखी कोणी व्यक्ती आहे का जी या राष्ट्रीय आपत्तीला थांबवु शकेल? केवळ तेच वास्तविक कारण जाणतात आणि या परिस्थितीवर नियंत्रण करु शकात. सरकारला निचिरेनचं कुठे ऐकायचं होत? उलट त्यांनाच देशद्रोहाच्या आरोपाखाली पकडून मृत्यूदंडाची शिक्षा दिली गेली. त्यांना मारण्याची सर्व तयारी झाली होती. चारही बाजूंनी सैन्याने घेराव घातला होता. साक्ष देणारा अधिकारी खुर्चीवर बसला होता. त्यांच्या मागे वध करणारा उभा होता. पेंढ्यांच्या चटईवर भिक्षु निचिरेन बसले हाते, त्यांचे दोन्ही हात जोडून ते उच्चारण करत होते. नम: सद्धर्मपुंडरीकाय तलवारीने त्यांच्या डोक्यावर प्रहार होणार इतक्यातच आगीच्या गोळ्यासमान एक प्रकाशमान वस्तु पूर्व-दक्षिणेकडून उत्तर-पश्चिमेच्या दिशेने आकाशाला प्रकाशमान करीत निघून गेली. त्या प्रकाशात सर्वांचे चेहरे दिसू लागले. अधिकारी आणि शिपाई घाबरले आणि वध करणाऱ्याच्या हातातून तलवार निसटून पडली. तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. काही शिपाई घोड्यांच्या पाठीवरच घाबरुन आडवे झाले आणि काही पळाले. या गोंधळात निचिरेन यांची प्राणवधाची शिक्षा असंभव होती आणि सरकारने भीतीने त्यांच्या वधाची आज्ञा मागे घेतली. त्याऐवजी निचिरेन यांना सोदा द्वीप जे जपानच्या उत्तरी समुद्रात आहे तिथे निर्वासित केलं गेलं. तिथं त्यांनी अंधविश्वासाच्या विरोधात आवाज उठवला आणि भगवान बुद्धांचा परिपूर्ण उपदेश सद्धर्मपुंडरीक सूत्राचा प्रचार करत असताना अडीच वर्षांचा काळ घालवला. यानंतर सरकारने त्यांच्यावरील निर्वासनाचा दंड हटविला. निचिरेन यांची वृत्ती एकान्त मनाची होती आणि ती धर्म प्रचाराकरीता आवश्यक आहे असे ते मानत होते. ते फूजीयामाच्या पश्चिम मिनौबुच्या पहाडांमध्ये एकान्त ध्यानाकरीता निघून गेले. तिथे ते आठ वर्ष राहीले.

महात्मा निचिरेन मोठे उत्कर्ष साहसी पुरुष होते. मंगोल आक्रमणाच्या वेळी निचिरेन यांनी त्यांना तुच्छ मंगोल म्हटलं होतं आणि जपानच्या आशामय भविष्याकरीता आस्था दाखविली होती. तरीही ते युद्धवादी नव्हते तर ते शांतिवादी होते. त्यांनी त्यांच्या शिष्याला जो मंगोलांच्या विरुद्ध लढत होता. त्याला लिहीले होते की, युद्ध चालू आहे. देशातील सर्व मनुष्य या वर्तमान जीवनात

असूर बनतील आणि मरणानंतर अधर्म योनींत जन्म घेतील. तू ही युद्ध क्षेत्रात मरु शकतोस. तरीही निश्चय ठेव की आपण गृद्धकूट पर्वतावर भेटूया. जरीही तू या विपत्तिमध्ये सामिल आहेस तरीही हे विसरु नकोस की, तुझा आत्मा भगवान बुद्धांच्या आत्म्यासोबत आहे. या जीवनात तू असूरांच्या जीवनात भाग घेत आहेस परंतु मृत्यू नंतर तू बुद्ध लोकांत जन्म घेशील. मंगोलांचे आक्रमण अपयशी झाले आणि देश विनाश होण्यापासून वाचला. शिङ्गोन् मतवादी देवतांच्या या कृपेमुळे अनेक रहस्यवादी कर्मकांड करु लागले आणि या आधी जेवढी मिळत होती त्यापेक्षा अधिक दक्षिणा पुरोहित मिळवू लागले. जपान मध्ये त्यावेळी अंधविश्वास पसरला होता. मंगोलांपासून वाचणे याला निचिरेन जपानचं वास्तविक संरक्षण मानत नव्हते. सर्व अंधविश्वासातून मुक्त होऊन जपानला भगवान शाक्यमुनिंचा मार्ग पूर्णत: स्विकारला पाहिजे. जपानची पूर्ण विमुक्ती ही बौद्ध धर्म पूर्णपणे स्विकारण्यात आहे असे ते मानत होते. जपानमध्ये या सत्याद्वारे बौद्ध धर्माची पूर्ण स्थापना ही मोठी गोष्ट आहे. एक दिवस किंवा एका तासाकरीता ही देश कसा सुरक्षित राहू शकेल जोपर्यंत भगवान शाक्यमुनी गृद्धकुट पर्वताचे उपदेशक त्यांची दृष्य आणि अदृश्य सहाय्यता आणि सुरक्षा या देशाला देत नाहीत. त्यांचं स्वप्न होतं की जपान हे विश्वभरात बौद्ध धर्माच्या प्रचाराचे केंद्र व्हावे आणि बौद्ध धर्माची जन्मभूमि असलेल्या भारतातही तो इथूनच जावा. चीन आणि जपानच्या एका परंपरेनुसार भारत हिंदुचा देश म्हटला जात होता. त्याचा याच नावाने उच्चार करत महात्मा निचिरेन करतात, "भारत हिंदू देश म्हटला जातो. हा या देशातील भगवान बुद्ध यांच्या उदया संबंधी भविष्यवाणी सूचक आहे. आपला द्वीप जपान हा सूर्योदयाचा देश मानला जातो. हाच तो देश नाहीये का जिथे भगवान पुढे उत्पन्न होणार आहेत. चंद्र पश्चिमेकडे उगवून पूर्व दिशेकडे जातो या प्रतिकाचा अर्थ आहे बौद्ध धर्म पूर्वेकडे जाणार सूर्य पूर्वेकडे उगवून पश्चिमेस लपतो हे या गोष्टीच लक्षण आहे की बुद्ध धर्म सूर्योदयाच्या (जपान) देशाकडून परत हिंदूच्या देशात (भारत) परत जाणार."

इ.स. 1272 मध्ये महात्मा निचिरेन यांनी 'आँखों का खोलना' या नावाचा एक निबंध लिहीला होता. ज्यामध्ये त्यांनी आपल्या देशवासियांना कन्फयूशियस धर्म, हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म यासंबंधी तुलनात्मक अभ्यास करण्यास सुचना केल्या होत्या. त्यांनी आणखी एका ठिकाणी लिहीले आहे. "जर तुम्ही या क्षणी बुद्धत्वाचा साक्षात्कार करु इच्छिता तर अभिमानाचा ध्वज खाली करायला हवा. क्रोधाची गदा फेकून द्यायला हवी आणि परम सत्यरुपी बुद्ध शासनावर विश्वास ठेवा. यश आणि लाभ या जीवनातील मृगजळा व्यतिरीक्त काही नाहीये. गर्व आणि अहंकार हे केवळ भावी जीवनातील बंधने आहेत. जर तुम्ही एका खोल खड्यात पडले आहात आणि तुम्हाला काढण्याकरीता कोणी दोरी टाकली आहे, तेव्हा तुम्ही केवळ याकरीता तुम्हाला बाहेर काढणाऱ्याच्या शक्तीवर विश्वास न ठेवता ती दोन्ही पकडणार का? बुद्धाने ही घोषणा नाही केलीये का, की मी एकटा रक्षक आणि त्राता आहे हीच शक्ती आहे? हा उपदेश सांगितलेला नाहीये का, श्रद्धा हेच (निर्वाण) द्वार आहे? हीच दोरी आहे." जो याला पकडण्यास संकोच करतोय आणि पवित्र सत्याचे (नम: सद्धमपुंडरीकाय) उच्चारण करत नाही. तो बोधी प्राप्त करु शकत नाही. एक दिवस असा जाऊ शकेल जेव्हा त्या उपदेशाचे जो सांगतोय की जगात असा कोणी नाही जो बुद्धत्व प्राप्त करु शकत नाही त्याची पूजा न करता, सद्धर्मपुंडरीकाची श्रद्धेने पूजा करा, त्याचे स्वत: उच्चारण करा आणि दुसऱ्यांनाही उच्चारण करावयास प्रेरित करा. हेच या मानवी जीवनाचे कर्तव्य आहे. स्वत: निचिरेन यांचा अनुभव कोणत्या उंचीपर्यंत पोहोचला होता याचे दर्शन त्यांच्या एका उद्गारात आहे. जे त्यांनी सादो द्वीप वरील गंभीर एकांतवासात असताना प्रकट केले होते. "पहाडांमध्ये वसलेली ही जागा सांसारीक जिवनापासून एकदम वेगळी आहे. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण जवळपास कोठेही मनुष्य वस्ती नाहीये. यावेळी मी अशा एकांत आश्रमात रहात आहे. परंतु माझ्या छातीमध्ये निचिरेनच्या मांसल कायेमध्ये ते रहस्य लपलेले आहे, जे भगवान शाक्यमुनींनी गृद्धकूट पर्वतावर प्रकट केले होते आणि ज्याचा उत्तराधिकार मला मिळाला आहे. मी जाणतोय माझं हृदय ती जागा आहे जिथे असंख्य बुद्ध ध्यानस्थ बसले आहेत. ते माझ्या जिभेवर धर्मचक्र प्रवर्तन करत आहेत. माझा कंठ त्यांना जन्म प्रदान करतो आहे, माझ्या मुखात ते सम्यक संबोधि प्राप्त करत आहेत. ही जागा (पहाडी स्थान) अशा निचिरेन यांचं निवासस्थान आहे, जो रहस्यात्मक रुपाने सद्धर्मपुंडरीक याचा साक्षात्कार आपल्या जीवनात करीत आहे. त्यामुळे खरंच हे स्थानही गृद्धकूट पर्वतापेक्षा कमी पवित्र नाही. सत्य महान आहे. ज्या जागी सत्याचा साक्षात्कार केला जातो ती जागाही महान आहे. कारण अशा प्रकारच्या जागांनाच ते स्थान मानलं पाहिजे जिथे सर्व तथागतांनी परिपूर्ण ज्ञान प्राप्त केले. त्याच जागी सर्व तथागतांनी धर्मचक्राला प्रवर्तित केलं आहे, त्याच जागेवर सर्व तथागतांनी महापरिनिर्वाणात प्रवेश केला. हाच भाव व्यक्त करताना निचिरेन यांनी सूत्रात्मक रुपात आणखी एका ठिकाणी म्हटले आहे, "भगवान" बुद्धांनी आपल्या जीवनकाळात ज्या सत्यांना प्रकट केलं त्या सर्वांचं अस्तित्व आपल्या आत मध्ये आहे. जर ते जाणलं तर आपल्याला आत्मज्ञान प्रकट होते. याप्रकारे अशा अनेक उद्गारांत महात्मा निचिरेन यांनी ज्ञानाच्या त्या अद्वैत अवस्थेकडे संकेत केला आहे, जिथे आत्मा, बुद्ध आणि सत्ता हे तीन मिळून एक होतात ज्याशिवाय वेगळे अस्तित्व राहात नाही. या वैचारिक भावना अधिक

स्पष्ट करुन त्यांनी एका पत्रात लिहील्या आहेत. जे पत्र त्यांनी त्यांच्या एका शिष्य भिक्षुणीला लिहीले आहे. पत्राच्या शेवटी ते लिहीतात, "जेव्हा तूला निचिरेनला पाहण्याची इच्छा होईल तेव्हा आदरपुर्वक उदय होणाऱ्या सूर्याला पहा किंवा सायंकाळी उगवणाऱ्या चंद्राला पहा. माझं व्यक्तीत्व सदैव सूर्य आणि चंद्रामध्ये प्रतिबिंबीत आहे. आणि यानंतर मी तुला गृद्धकुट पर्वतावरच भेटेन. हा जो पुरुष सूर्यात आहे तोच मी आहे, हे तर उपनिषदात ऋषिने म्हटलं होतं परंतु या सर्वोत्तम सत्याची साक्ष जपानी संत निचिरेन यांनी त्यांच्या वरील उद्गारात दिली आहे. इथे केवळ दोन मौल्यवान आध्यात्मिक अनुभवांची एकता याकडे लक्ष्य वेधणे हा उद्देश आहे. महात्मा निचिरेन यांच्या चरित्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची कृतज्ञता आणि पर दु:ख कातरता. आपल्या एका शिपाई शिष्याला ज्याने निचिरेन यांना वध स्थानावर घेऊन जात असताना सहानुभूति दाखविली, पत्रात त्यांनी लिहीलंय."मला आठवतंय जेव्हा मला वध करण्याकरीता नेले जात होते. तेव्हा तू माझे अनुसरण करत येत होतास. जर तू तुझ्या पूर्वजन्मांच्या पाप कर्मामुळे नरकांत जरी जाऊन पडलास आणि त्यावेळेस माझे स्वामी भगवान शाक्यमुनींनी मला बुद्धत्वाकरीता कितीही निमंत्रण दिले तरी मी त्यांची आज्ञा न पाळता, निश्चितच नरकांत जाईन जिथे तू असशील. जर तू आणि मी नरकात असू तर निश्चितच शाक्यमुनी बुद्ध आणि सद्धर्मपुंडरीक ही आपल्या सोबत तिथे असतील."

मिनोबूच्या पहाडांमध्ये आठ वर्ष एकांत ध्यान केल्यानंतर निचिरेन यांनी विचार केला, आपल्या भगवान शाक्यमुनि यांनी त्यांच्या जीवनातील अंतिम आठ वर्ष गृद्धकूट पर्वतावर सद्धर्मपुंडरीक चा प्रकाश केला होता आणि महापरिनिर्वाणाकरीता ते उत्तर - पश्चिम दिशेला कुशीनगरला निघून गेले. मी ही माझी आठ वर्ष मिनोबू वर घालवली आहेत, आता मला जिवनाच्या अंतिम क्षणाची तयारी करायला हवी. ते उत्तरेकडे चालत जाऊन इकेगामी नावाच्या भागात पोहोचले. तिथे त्यांनी 61 व्या वर्षी सद्धर्मपुंडरीक मध्ये सांगितलेल्या भगवान तथागतांच्या उपदेशाचे आपल्या शिष्यांसहित उच्चारण करीत निर्वाणात प्रवेश केला.

"जेव्हा पासून मी बुद्धत्व प्राप्त केलंय असंख्य अपरिमित युगं लोटली आहेत. या काळात मी सातत्याने सत्याचा उपदेश करीत आलो आहे. अनेक प्राण्यांना मी बुद्धांच्या मार्गावर आणले आहे."

याप्रकारे अनेक अपरिमित युगं उलटली आहेत. प्राणी मात्रांना जागे करण्याकरीता मी महापरिनिर्वाणाचा प्रकाश करतो आहे. उपाय कौशल्यांच्या मदतीने वास्तवात मी कधी नष्ट न होता शाश्वत काळापर्यंत राहून सत्याचा प्रकाश करतो आहे. मी संसाराचा पिता आहे.

मनुष्यांना मोहात अडकलेलं पाहून मी मला मरताना दिसतो, परंतु वास्तवात मी सदैव जीवंत आहे. मी सतत हे बघत असतो की, प्राणीमात्र सन्मार्गाच्या प्रति श्रद्धावान आहेत की नाहीत आणि मी सत्याच्या अनेक रुपांचा त्यांना उपदेश करीत असतो. त्यांच्या वेगवेगळ्या शक्ती आणि धारणांनुसार त्यांच्या निर्वाणाकरीता.

आता माझी केवळ एकच इच्छा आहे. "की कशाप्रकारे सर्व प्राणी कल्याणकारी मार्गावर चालतील आणि लवकरच निर्वाणाचा साक्षात्कार करतील."

मराठी अनुवाद - **मेघना राजन आयरे**

**TATHAGAT PUBLICATIONS**

*Arvind Bhandare*
Proprietor

• Books on Buddhism •Books on Pali Language •Books on Ambedkarism
• Buddhist Children Books •Buddhist Calender •Buddhist Year Diary •Lantern / Flag
• T-Shirt / Caps •Dhamma Tour •Buddha Statue

Web: tathagattours.in • Mob. : 9967692014

## प्रगतीचे सात नियम

**- राजेश चंद्रा, लखनऊ**

वैशाली येथील वज्जी प्रजासत्ताकाच्या मंत्र्यांनी स्वत:च्या हिताचा एक प्रश्न केला की, आमच्या वज्जी प्रजासत्ताकाची प्रगती कशी होणार? एक अर्थी प्रश्न पूर्णत: वैयक्तिक आहे, वज्जी च्या संदर्भात प्रश्न विचारणारा मर्यादित आहे, परिघबद्ध आहे, ते आपल्या प्रजासत्ताकाच्या प्रगतीच्या विचाराने चिंतातुर दिसतात. परंतु दुसऱ्या अर्थाने प्रश्न व्यापक आहे, सार्वत्रिक आहे. कोणाला प्रगती नको? प्रत्येकाला प्रगती हवी असते. प्रत्येक समाजाला प्रगती करण्याची अपेक्षा आहे. प्रत्येक संघटना प्रगतीप्रिय आहे. प्रत्येक संस्था प्रगतीच्या अपेक्षेत असते. इतकेच नाही तर नकारात्मक व्यक्ती, संस्था, संघटना जसे की आतंकवादी संघटनेला सुद्धा प्रगती करावयाची असते.

भगवान बुद्ध वैशाली मध्ये वर्षावास करत होते. ज्यावेळी वज्जी प्रजासत्ताकाचे अमात्य, शास्त्याच्या दर्शनाकरिता आले. त्यांनी प्रश्न केला की, आमच्या प्रजासत्ताकाची प्रगती कशी होणार? आमचे कल्याण कसे होणार? भगवान बुद्धांनी वज्जी लोकांना प्रगतीचे सात नियम सांगितले. बऱ्याच वर्षानंतर ज्यावेळी, भगवान, दसबल, राजगृहा मधील गृध्रकूट पर्वतावर चारिका करत होते, वर्षावासाच्या प्रवासात होते. त्यावेळी सम्राट अजातशत्रूने त्याच्या वस्सकार नावाच्या, एका खाजगी दुताला भगवंतांजवळ पाठवले. आनंद त्यावेळी भगवंतांसाठी पंखा हलवत होते, वस्सकाराने तथागतांच्या समोर सम्राट अजातशत्रूचा खाजगी संदेश कथन केला. भगवान सम्राट अजातशत्रू वज्जी प्रजासत्ताकावर आक्रमणाची योजना बनवत आहेत.

वास्तविक, अजातशत्रूने त्याचा खासगी दूत वस्सकाराला हा निरोप देऊन पाठवले होते की, भगवंताजवळ वज्जी प्रजासत्ताकावर, राज्यावर आक्रमण करण्याची गोष्ट जास्त जोर देऊन कर, त्यावर भगवंत काय म्हणतात हे येऊन मला सांग. महत्वाची गोष्ट ही की, बुद्धांच्या जवळ फक्त धार्मिक सल्ल्याकरिताच लोक येत नसत, व्यापारी विचारपूस करण्यासाठी येत असत, सम्राट राजनीतिक-प्रशासकीय विचारविनियम करण्याकरीता येत. धार्मिक लोक धार्मिक उत्सुकता दाखवत. संपूर्ण तिपिटक अशा विविध भागांनी परिपूर्ण आहे. आपण सीगाल, मीगारमाता विशाखा, सुदत्त, तरुण दिघजाणु यांना सांगितलेल्या, सद्गृहस्थी वरील उपाय ऐकताना पाहिले आहे. कधी नरदत्ताला शेतीबाबत संवाद करताना पाहतो, तर कधी महाकश्यप-मोग्गलायन यांच्यासोबत गंभीर मुलभूत चर्चेत गर्क झालेले पाहतो. तर कधी सम्राट बिंबिसार प्रसेनजित, अजातशत्रूला भगवंतांकडून राजनीतिक-आर्थिक-प्रशासकीय सल्लामसलत, समुपदेशनासाठी प्रार्थना करताना पाहतो. हे तथागतांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे दर्शक पैलू आहे.

वस्सकाराने कथन केलेला प्रसंग ऐकून भगवंतांनी आनंदाला विचारले आनंद, काय वज्जी गणराज्याचे लोक वारंवार एकत्र येऊन सभा भरवतात का? आनंदाने उत्तर दिले, महाभदन्त, मी असे ऐकले की वज्जी प्रजासत्ताकातील लोक वारंवार एकत्र येऊन सभा भरवतात.

भगवंतांनी पुढील प्रश्न विचारला, सर्व वज्जी लोक एकत्र येतात का? मैत्रीपूर्ण पद्धतीने बैठक, सभा भरवतात का? त्यांच्या सभेचा शेवट मैत्रीपूर्ण पद्धतीने होतो का? वाद तर होत नाही? आनंदाने म्हटले, भगवान आम्ही असे ऐकले की, सर्व वज्जी लोक एकत्र येतात त्यांच्या बैठका, सभा मैत्रीपूर्ण असतात. सभेत वाद होत नाही आणि सभेचा शेवट सुद्धा मैत्रीपूर्ण होतो.

भगवंतानी तिसरा प्रश्न विचारला, काय वज्जी गणराज्याचे लोक त्यांच्या बनविलेल्या विधानांचे पालन करतात का? त्यांच्या बनवलेल्या विधानाला ते स्वत: तोडत तर नाही? आनंदाने उत्तर दिले, मी असे ऐकले की, वज्जी गणराज्याचे लोक त्यांनी बनवलेल्या विधानांचे पालन करतात. स्वत: बनवलेल्या विधानांचा भंग करत नाहीत आणि स्वत: बनवलेल्या विधानाबाबत असे म्हणत नाही, की आम्ही बनवले नाही.

भगवंताने चौथा प्रश्न विचारला, काय वज्जी गणराज्याचे लोक त्यांच्या पेक्षा वरिष्ठ नेत्यांकडून सल्ला घेतात का? त्यांच्या सतत संपर्कात राहतात का? त्यांना योग्य तो मानसन्मान देतात का? आनंदाने विनम्रतापूर्वक म्हटले, मी असे सुद्धा ऐकले की, वज्जी लोक आपल्यापेक्षा वरिष्ठ लोकांच्या सतत संपर्कात राहतात. त्यांच्याकडून सल्लामसलत घेतात, त्यांना यथोचित मानसन्मान देतात.

भगवंत विचारतात, आनंद वज्जींच्या राज्यात अविवाहित मुली व विवाहित स्त्रिया सुरक्षित आहेत का? त्यांच्यावर अन्याय तर होत नाही? त्यांचा अपमान तर करत नाही? आनंद सांगतात, भन्ते मी असे ऐकले की, वज्जीच्या राज्यात अविवाहित मुली व स्त्रिया सुरक्षित आहेत. वज्जी लोक त्यांच्यावर अन्याय करीत नाहीत व त्यांचा अपमान ही करीत नाहीत.

भगवंतांनी सहावा प्रश्न विचारला, आनंद काय वज्जी लोक त्यांच्या नगरातील, नगराबाहेरील देवस्थानाचे, पवित्र ठिकाणांचे रक्षण करतात का? त्यांच्या पूर्वजांच्या आठवणीत स्मारक चैत्य-स्तूप बनवतात का? त्यांच्या आठवणीत काही कार्यक्रम आयोजित करतात का? आनंदाने नम्रपणे उत्तर दिले, परम पावन, मी असे ऐकले की, वज्जींच्या राज्यात देवस्थान सुरक्षित आहेत. ते त्यांच्या पूर्वजांच्या आठवणीत चैत्य-स्तूप बनवितात. त्यांच्या आठवणीत समारोह आयोजित करतात.

भगवंतांनी सातवा प्रश्न विचारला, आनंद काय वज्जी लोक श्रमणांना भिक्खूंना, अर्हतांना पुरेसे संरक्षण देतात का? त्यांच्या राज्यात येऊन राहावेसे वाटते का? आनंदाने नम्रपणे सांगितले, हे महान, मी हे सुद्धा ऐकले की, वज्जींच्या राज्यात श्रमणांना, भिक्खूंना, अर्हतांना यावेसे व राहावेसे वाटते. त्यांना दान-मान व संरक्षण मिळते.

त्यावेळी भगवंतांनी सम्राट अजातशत्रूंच्या गुप्त दूत अमात्य वस्सकाराला म्हटले, एकदा वैशाली मध्ये मी वज्जींना प्रगतीचे हे सात नियम सांगितले होते. जोपर्यंत वज्जी या नियमांचे पालन करतील, तोपर्यंत त्यांची प्रगतीच होत राहील तोपर्यंत त्यांना कोणीच अजातशत्रू हरवू शकणार नाही. वस्सकाराने शरमेने मान खाली करत म्हटले, भगवान हे सात नियम तर खूप मोठी गोष्ट आहे. जर का वज्जी लोक, आपण सांगितलेल्या सात नियमांपैकी, एका जरी नियमांचे पालन करत असतील, तरीसुद्धा त्यांची प्रगतीच होणार, ऱ्हास होणार नाही, मग सात नियमांचा प्रश्नच काय. भगवंतांनी पुढे म्हटले, वैशालीचे फक्त दोनच शत्रू आहेत पूर व परस्परांतील मतभेद, वास्तविक, पूरग्रस्त शहराचे पुनर्वसन केले जाऊ शकते. परंतु, परस्पर मतभेदांमुळे नष्ट झालेले घर, शहर, समाज, देश महत्प्रयासाने एकत्र येतात.

इतिहास साक्षी आहे की, अजातशत्रूचा अमात्य, वस्सकारने नियोजित योजनांच्या माध्यमातून वज्जी संघांमध्ये फूट पाडून, भेद करुन, त्यांचा पराभव केला. त्यावेळी भगवान बुद्धांनी आपल्या महापरिनिर्वाण भूमी कुशिनाराकडे जाण्यापूर्वी गृध्रकूट पर्वतावरच भिक्खू संघाला एकत्रित केले, व धम्माच्या विकासासाठी, वाढीसाठी तेच सात नियम सांगितले. वेळोवेळी एकत्र येणे, मैत्रिपूर्ण मार्गाने एकत्र येणे, धार्मिक विधी एकत्र करणे, आर्य मौन धारण करणे, धम्माचा अभ्यास-चर्चा करणे, धम्मामध्ये ज्येष्ठांशी सतत संपर्क ठेवणे, कल्याण मित्र बनवणे इत्यादी.

त्याचबरोबर भगवंतांनी हे ही सांगितले की, जंगलात मेलेल्या सिंहाला जसे इतर प्राणी स्पर्श करण्याची हिंमत ठेवत नाही, मेलेल्या सिंहाला सुद्धा जंगलातील इतर प्राणी घाबरतात. त्यांना वाटते की सिंह झोपलेला आहे. झोपलेल्या सिंहाला जागे करण्याचे धैर्य कोणाकडेच नसते. भगवान बुद्ध म्हणाले की केवळ मृत सिंहाच्या शरीरावर पडलेले किडेच त्याचा नाश करु शकतात, त्याचप्रमाणे परस्परात पडलेल्या फुटीचे कीडेच संघाचा ऱ्हास करु शकतात. धम्म नष्ट करु शकतात, कोणतीही बाह्य शक्ती संघाला भंग करु शकत नाही किंवा खंडित करु शकत नाही.

भगवान बुद्धांकडून वज्जी लोकांसाठी निर्दिष्ट केलेल्या या सात नियमांच्या संदर्भाने मी म्हणू शकतो की, हे सात नियम फक्त वज्जी लोकांसाठीच नव्हते किंवा भिक्षु संघासाठी नव्हते उलट हे सर्व मानवांना उद्देशून आहेत. याला चांगल्या व्यवस्थापनाचे सात नियम सुद्धा म्हणू शकतो. हे सात नियम जेथे जेथे लागू केले जातील असे घर, नगर, शहर, संस्था, संघटना, समाज, प्रांत, राज्य, प्रदेश, देश तेथे सर्वांची प्रगतीच होणार. अधोगती होणार नाही, भारताचे विद्वान, संविधान कर्त्यांने भारतीय घटनेत सुद्धा या सात नियमांचा समावेश केला आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बी.आर.आंबेडकर यांना नोव्हेंबर 1956 कोलंबो, श्रीलंकेतील एका कार्यक्रमात विचारले होते की, भारतीय राज्यघटनेत तुम्ही ज्या लोकशाही तत्वांचा समावेश केला, ते तुम्ही कोणत्या देशाच्या घटनेतून घेतले आहेत? बाबासाहेब अतिशय धैर्याने म्हणाले, मी भारतीय संविधानात लोकशाहीची तत्वे बुद्धांच्या संघातून घेतली आहेत. विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा, हिवाळी, उन्हाळी आणीबाणी सत्र, मंत्रिपरिषद, मंत्रिमंडळ चर्चा, परिचर्चा संवाद, परिसंवाद, मंत्रिमंडळाचाा निर्णय, इत्यादी म्हणजेच या सात नियमांपैकी पहिल्या नियमाची अंमलबजावणी होय, पुन्हा पुन्हा एकत्र येणे.

महासंचालकाने संचालकाकडून, शासकीय संचालकाने शासकीय सचिवा कडून, सचिवाने मुख्य सचिवा कडून सल्लामसलती घेणे, मार्गदर्शनाची विनंती करणे, अंमलबजावणीची पूर्व मंजुरी मिळवणे, मुख्य सचिवाने प्रधान सचिवाची, मंत्र्याने मुख्यमंत्र्याची, मुख्यमंत्र्यांने राज्यपालाची, प्रधानमंत्र्याने राष्ट्रपतीची नियमितपणे भेट घेणे, सल्लामसलत करण्यासाठी औपचारिक भेट घेणे, त्यानुसार पालन करणे, मुख्यमंत्र्याकडून पंतप्रधानाचे स्वागत करणे, उच्च अधिकारी यांच्या आगमनानंतर बसलेल्यांनी खुर्ची सोडणे, शिष्टाचार पाळणे, आपल्यापेक्षा ज्येष्ठांच्या सतत संपर्कात राहणे, त्यांना यथोचित मानसन्मान देणे, ही नियमांची कायदेशीर अंमलबजावणी आहे.

भारतीय राज्यघटना ही महिलांच्या हितासाठी मोठी सहाय्यकारी आहे, याचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे मुख्यमंत्री, पंतप्रधान, राज्यपाल, राष्ट्रपती ही सर्वोच्य पदे महिलांनी भूषवलेली आहेत. आपल्या धर्मनिरपेक्ष सन्मानानुसार भारतीय राज्यघटनेने देशातील सर्व धर्मांच्या धर्मस्थळांना संरक्षण पुरवले आहे. सर्वोच्च श्रद्धेला संरक्षण दिले आहे. सर्वांच्या सणांना सार्वजनिक मान्यता, सुट्टी दिली आहे. विविध मत, पंथ धर्माच्या साधू संत महात्म्यांना देशात दान-मान संरक्षण दिले आहे. त्यांना इथे घेऊन राहावेसे वाटते. सांगण्याचा मतितार्थ हाच की, भारतीय राज्यघटनेत बुद्धांनी सुचवलेल्या, सांगितलेल्या प्रगतीच्या सर्व सात नियमांचा समावेश आहे. घटनेने किमान वांशिक, उपजाती, धर्म, प्रांत, समुदाय यांच्यात विभागलेल्या या देशाला किमान कायदेशीररित्या एकत्र केले आहे. त्यांना मैत्रीच्या धाग्यात बांधले आहे. हिंदू, मुसलमान, सिख, ईसाई, पारसी, सवर्ण, अवर्ण, मागास, अतिमागास, आदिवासी इत्यादी सरकारी यंत्रणेत सर्व समान आहेत, एकत्र आहेत.

अजातशत्रूचा गुप्त दूत, अमात्य वस्सकारच्या बोलण्यातही सामर्थ्य आहे की, वज्जी लोक फक्त एका नियमाचे जरी पालन करीत असतील तरी, त्यांची प्रगतीच होणार अधोगती होणार नाही. हे सांगायला नकोच की राज्यघटनेच्या अंमलबजावणी नंतर आज पुन्हा एकदा भारत जागतिक व्यासपीठावर एक महान शक्ती, सामर्थ्यशाली देश म्हणून उदयास येत आहे. भारत आर्थिक, लष्करी, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात प्रमुख आहे. हीरो होण्यासाठी सज्ज आहे. बुद्धांद्वारे अधिनियमित केलेले सात नियम जर क्रियान्वित झाले तर तो दिवस दूर नाही जेव्हा देश सम्राट अशोककालीन भारतासारखा विश्ववंदनीय व विश्वपूज्य होता. वास्तविक समता, बंधुत्व मैत्री प्रस्थापित करण्यात अडचण कुठे आहे?

घटनात्मक आदर्श आणि सामाजिक वर्तन यांच्यातील दरी ही मोठी समस्या आहे, घटनात्मक रित्या देशात समता, बंधुता, मैत्री कायम आहे. सरकारी यंत्रणेत सर्वजण मित्रत्वाने काम करीत आहेत, परंतु सामाजिक व्यवहारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जातिवाद भेदभाव आहे. उच्च-निच्च दर्जा हे देखील अस्तित्वात आहे. मला नाही वाटत की, याला सिद्ध करण्याकरीता उदाहरणांची आवश्यकता आहे. हे कठोर सत्य आहे. यासंबंधाने देशातील प्रत्येक नागरिक परिचित आहे. नियम, मानवाचे वर्तन बदलू शकतात, त्याला बाह्यरित्या बदलू शकतात, परंतु त्याचे मन मात्र बदलू शकत नाही. नियमांचे पालन करणे असहाय्य असू शकते, अशक्तपणा किंवा गरज असू शकते.

जबरदस्ती, सक्ती, अशक्तपणा भीती किंवा गरज हे वर्तन बदलण्यास कारणीभूत ठरु शकते, मन नाही आणि मानसिक बदल, मन परिवर्तनाशिवाय कोणताही सामाजिक बदल शक्य नाही. घटनात्मक आदर्श आणि सामाजिक आचरण, परस्पर व्यवहार यांच्यातील अंतर केवळ मन परिवर्तनानेच कमी होणार. इथे (मनातील) अंतर जेवढे कमी असेल तेवढाच हा देश अधिक सामर्थ्यवान आणि समृद्ध होईल. देशातील जनता सुखी व आनंदी होईल या देशात बुद्धांच्या धम्माची पुन्हा प्रतिष्ठापना, कोणत्याही जाती, समाज किंवा वर्गासाठी नाही तर राष्ट्रासाठी फायदेशीर आहे. जगात असे खूप कमी देश आहेत ज्यांना राज्य किंवा राष्ट्र म्हणू शकतो. भारत त्यांच्यापैकीच एक वेगळा देश आहे, जो राष्ट्र पण आहे आणि राज्य सुद्धा आहे. राजकीय सिमेचे नाव राज्य आहे. सांस्कृतिक विस्ताराचे नाव राष्ट्र आहे.

भारत नावाचे राष्ट्र फक्त काश्मीर पासून ते कन्याकुमारी आणि अरुणाचल प्रदेश ते गुजरात पर्यंत मर्यादित नाही तर, त्याच्या सांस्कृतिक वर्तुळात तो प्रत्येक देश समाविष्ट आहे ज्यामध्ये बुद्धांचा धम्म प्रतिष्ठित आहे. ते भूतान, जपान, व्हियतनाम, कोरिया, थायलंड, म्यानमार, श्रीलंका हेच नाही तर पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान सुद्धा भारताच्या सांस्कृतिक परिघाचा एक भाग आहेत. ज्या ज्या देशांमध्ये बुद्ध धम्म अल्पमात्र आहे त्याची मूळं सुद्धा भारताशी जोडलेली आहेत. जिथपर्यंत भगवान बुद्धांच्या धम्माचा पसारा आहे, तिथपर्यंत भारत विस्तारलेला आहे. भारताच्या सांस्कृतिक मानचित्रामध्ये जवळपास दोन तृतीयांश विश्व सामावलेले आहे. जर भारताने आपली ओळख बौद्ध देश म्हणून पुनर्स्थापित केली, जसे की बाबासाहेबांनी याचे निर्देश पन्नास वर्षापूर्वीच दिले होते तर कमीत कमी दक्षिण पूर्व आशियातील समस्त देश भारताचे स्वाभाविक मित्र होतील.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की जवळपास सहा दशकांपासून काश्मीर हिंसाचार आणि दहशतीच्या आश्रयाखाली आहे. परंतु आजपर्यंत तिथे मुस्लीम बौद्धांच्या दंगली झाल्या असे ऐकले नाही. काश्मीर मधील लद्दाख या शहराची ओळख बौद्धांमुळेच आहे. म्हणजेच मुस्लिमांच्या मनात सुद्धा बौद्धांसाठी वैर नाही. जर भारताची ओळख बुद्ध धम्म असेल तर पाकिस्तान व बांगलादेश हे भारताचे मित्र राष्ट्र असतील. पाकिस्तानमध्ये तक्षशिला विद्यापिठाचे अवशेष सांभाळून ठेवलेले आहेत. अफगाणिस्तानच्या संग्रहालयात बुद्धांच्या मुर्त्या आहेत. चीनची राजकीय ओळख

आज साम्यवादी देश म्हणून असू शकते, परंतु सांस्कृतिक दृष्ट्या तो आजही बौद्ध देश आहे. भारताने सीमा संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले तर शेजारील देशांशी ताणलेले, विस्कटलेले संबंध आपोआपच मैत्री पूर्ण होतील. भारताच्या सीमा सुरक्षित होतील. आजची सर्वांत भयावह समस्या दहशतवादावर मात करता येईल. आणि जगभरातील नाहीतर कमीत कमी आग्नेय देशातील बौद्धांचे देश जसे कोरिया, तैवान, सिंगापूर, जपान, व्हिएतनाम, म्यानमार, थायलंड इत्यादी देशांसह भारताच्या सहयोगी संघटनांचा एक गट सज्ज होईल. संटघनात्मक आदर्श आणि सामाजिक वर्तन यांच्यातील दरी जितकी कमी होईल त्याच प्रमाणात देश अधिकाधिक सामर्थ्यवान व समृद्ध होईल. ही दरी कमी करण्याची जबाबदारी सर्वांची आहे, परंतु सर्वात मोठी जबाबदारी त्यांची आहे जे सामाजिक भेदभावाचे बळी ठरलेले आहेत. सर्वाधिक पीडित, शोषित, दुखावले आहेत, अपमानित आहेत. त्या पीडितांना, शोषितांना बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांनी या समस्येवर एक उपाय दिला आहे. बुद्धांचा धम्म. ही त्यांची जबाबदारी आहे जे स्वत:ला बौद्ध म्हणतात जे स्वत:ला डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या बुद्धधम्माचे अनुयायी म्हणतात.

जर मला एक ओळीत बुद्ध धम्माची व्याख्या करायला सांगितली तर, मी म्हणेन की मनाच्या सकारात्मक बदलाच्या विज्ञानाचे नाव बुद्ध धम्म आहे. जे विज्ञान मनाला सकारात्मकतेने बदलवते, त्याचे नाव बुद्ध धम्म आहे. बुद्ध धम्माची पहीली गाथा आहे, मनोपुब्बङ्गमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया... मन सर्व धर्मांचे (अवस्थेचे) प्रमुख आहे. सर्व सृष्टी आनंददायक आहे. एक काळ असा होता की त्या वेळी म्हणत असत, जो देवाला मानत नाही, ज्याचा देवावर विश्वास नाही, तो नास्तिक आहे. बौद्धांसाठी विज्ञानच देव आहे. आता प्रश्न असा आहे की, जे स्वत:ला बौद्ध नवबौद्ध समजतात ते बुद्धाने सांगितलेल्या नियमांचे स्वत: किती पालन करतात? पुन्हा पुन्हा एकत्र येऊन बैठका घेतात? नवबौद्ध डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीला आणि काही लोक बुद्धजयंतीला एकत्रित होतात. वर्षाच्या 365 दिवसात 363 दिवस स्वत:ला बौद्ध म्हणून घेणारे हे लोक धर्मकार्यासाठी एकत्रित होत नाहीत तर मग धम्माची प्रगती कशी होणार? असे म्हटले जाते की, वाईट गोष्टी वाईटांच्या सक्रीय होण्याने नव्हे तर सज्जनांच्या निष्क्रीय राहण्याने निर्माण होतात, परंतु सज्जन निष्क्रीय का राहतात? कारण सक्रीय झाल्याने समस्या निर्माण होतात. धम्माच्या विकासासाठी कार्यक्षम बौद्ध होण्याची आवश्यकता आहे. सहनशील लोकांनी बुद्ध धम्माला टिकेचे समीक्षक बनवले आहे. त्यांच्या करिता फक्त टीका करणे म्हणजे बौद्ध धर्माची व्याख्या होय. आपण हे मान्य केले पाहिजे की, स्वत:ला नवबौद्ध समजणारे लोक कार्यक्षम नाहीत, सहनशील राहतात. पुन्हा पुन्हा एकत्रित येत नाहीत. नवबौद्धांचे असे एकही विहार नाही जिथे प्रत्येक आठवड्याला धम्म ऐकण्यासाठी ते एकत्रित येतात. मुस्लिम समाज, जैन समाज, सिख समाज यांचे अल्प संख्याबळ असून सुद्धा ते मजबूत आहेत. कारण की, कळत नकळत ते बुद्धांच्या एका नियमाचे वारंवार पालन करतात, नियमित पालन करतात. वेळोवेळी एकत्रित येणे आणि बौद्ध समाज स्वत:ला बुद्धांचे अनुयायी म्हणून सुद्धा बुद्धांच्या शिकवणुकीचे पालन करत नाही. पहिली गोष्ट आपण स्विकारली पाहिजे की, ती म्हणजे आपण पुन्हा पुन्हा एकत्र येत नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे एकत्रित आलो तरी ते फक्त वाद करण्यासाठीच येतो, बैठका मैत्री पूर्ण होत नाहीत. मी बुद्ध विहारात कितीतरी लोकांना वाद घालतांना पाहिले आहे. मग धम्माची स्थापना कशी होणार?

दोष त्यांचा नाही ज्यांची आम्ही टिका करतो, दोषी ते आहेत जे स्वत:चे निरीक्षण करण्यास असमर्थ आहेत. आम्हाला आपल्या विहारांना तीनरत्नांचे पवित्र स्थान बनवायला पाहिजे. मला आजपर्यंत भारतातील नवबौद्धांचे एक सुद्धा विहार बांधलेले किंवा नूतनीकरण केलेले दिसले नाही. सर्व अर्धवट बांधलेल्या, उध्वस्त, पडलेल्या अवस्थेत आहेत. होय, महाराष्ट्रातील काही विहारांची खुप सुंदर स्थिती पाहिली आहे.

जर विहारात सातत्याने धम्माचे उपक्रम होतात, उपासक-उपासिका नियमित येतात, धर्मग्रंथांचे एकत्रित वाचन होते, आठवड्यातून एकदा धम्मदेसना होते, ते विहार स्वत:च पूर्ण आकार घेते. 'विहार' या शब्दाचा अर्थच हा होतो की, भोजन आणि त्यानंतर, उपदेश देण्यासाठी चालणे. म्हणजेच गती किंवा चारिका. याचा अर्थ असा की, विहार हे धम्मकार्याचा केंद्रबिंदू असावे. जेथे प्रगती नसते अश्या फक्त विटांनी बांधलेल्या, वेढलेल्या परिसराला विहार म्हणणे योग्य नाही.

आम्हाला आठवड्यातून, महिन्यातून धम्म वर्ग सुरु करायला हवेत, एकत्रित येऊन सामुहिकरित्या धम्माचा अभ्यास करायला हवा, धम्मग्रंथाचे पाठ, वाचन करायला हवे. कमीत कमी आनापान सती व मैत्री भावनेच्या ध्यानाचा सराव करायला हवा. कारण की, मनाला बदलविण्याचे बलाढ्य साधन फक्त ध्यान हेच आहे.

धम्माचा प्रचार प्रसार फक्त ज्ञानाच्या तेजाने शक्य नाही. धम्माची प्रतिष्ठापना करण्याकरिता ध्यानाचे तेज व मजबूत शील हवे. याचबरोबर ज्ञानाचा प्रकाश तर सोन्याहून पिवळे. ध्यान व शील याचे महत्व सरावातूनच येणार फक्त अभ्यास करुन नाही.

(वरील व्याख्यान 2011 साली, महाराष्ट्रातील उल्हासनगर येथे तक्षशिला महाविद्यालय पालि पाठ संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात दिले गेले आहे.)

मराठी अनुवाद - **सुनिता गवई**

## बुद्ध धम्मात पौर्णिमांचे महत्व

**आषाढ पौर्णिमा** :- महामायेला सुमेध बोधिसत्वांचे जन्म घेण्यासंबंधी याचना करत असलेले स्वप्न पडले. बोधिसत्व सिद्धार्थांचा गृहत्याग. सारनाथ येथे प्रथम धम्म चक्र प्रवर्तन. वर्षावासाची सुरुवात.

**श्रावण पौर्णिमा** :- अंगुलीमालची धम्मदीक्षा प्रथम धम्म संगितीचे आयोजन.

**भाद्रपद पौर्णिमा** :- जीवकाद्वारे अजातशत्रू आणि भगवान बुद्धांची भेट.

**अश्विन पौर्णिमा** :- अश्विन पौर्णिमेला वर्षावास समाप्त होतो.

**कार्तिक पौर्णिमा** :- नदी काश्यप, उरूवेला काश्यप, गया काश्यप या तीन काश्यप बंधूची धम्मदिक्षा. धम्मसेनापती सारिपुत्तांची धम्मदीक्षा, अग्रश्रावक महामोग्गलान यांचे परिनिर्वाण.

**मार्गशीर्ष पौर्णिमा** :- नालागिरी हत्तीवर भगवान बुद्धांचा करुणामयी विजय.

---

## दिनविशेष

| | | |
|---|---|---|
| 6 जुलै | :- | परमपावन दलाई लामा जन्मदिवस. |
| 12 जुलै | :- | हेलेना ब्लावटस्की जन्मदिवस. |
| 20 जुलै | :- | जेम्स प्रिन्सेप जन्मदिवस. |
| 2 ऑगस्ट | :- | हेन्री स्टील ऑलकॉट जन्मदिवस. |
| 30 ऑगस्ट | :- | भन्ते सुरेई ससाई जन्मदिवस. |
| 17 सप्टेंबर | :- | भैय्यासाहब आंबेडकर स्मृतिदिन. |
| 17 सप्टेंबर | :- | अनागरिक धम्मपाल जन्मदिवस. |
| 17 सप्टेंबर | :- | पेरियार रामास्वामी नायकर जन्मदिवस. |
| 22 सप्टेंबर | :- | भाऊराव पाटील जन्मदिवस. |
| 29 सप्टेंबर | :- | विपस्सनाचार्य गोयंका गुरुजी स्मृतीदिन. |
| 2 ऑक्टोबर | :- | महात्मा गांधी जयंती, लाल बहादूर शास्त्री जयंती. |
| 9 ऑक्टोबर | :- | धर्मानंद कोसंबी जन्मदिवस. |
| 11 ऑक्टोबर | :- | थिक नाथ हान्ह जन्मदिवस. |
| 28 नोव्हेंबर | :- | महात्मा जोतिबा फुले स्मृतिदिन, अलेक्झांडर कनिंघहम स्मृतिदिन. |
| 6 डिसेंबर | :- | डॉ. बाबासाहब आंबेडकर महाप्रयाण दिन. |
| 12 डिसेंबर | :- | भैय्यासाहब आंबेडकर जयंती. |
| 20 डिसेंबर | :- | राष्ट्रसंत गाडगेबाबा स्मृतिदिन. |
| 27 डिसेंबर | :- | प्रो. ऱ्हिस डेव्हिड स्मृतीदिन. |

# राहुलमाता यशोधरा

**- मधुकर पिपलायन**

राजपुत्र सिद्धार्थ गौतमचे सर्वसंगपरित्यागाच्या ऐतिहासिक घटनेने राहुलमाता (राहुलची माता) यशोधराचे संपर्ण आयुष्य बदलते. संन्याश्याच्या वेशात असलेल्या राजपुत्र सिद्धार्थाचा निरोप घेतल्यानंतर जेव्हा छन्न कपिलवस्तूस परत आला, तेव्हा तो खूप दु:खी व निराश होता. सिद्धार्थाची राजेशाही वस्त्रे व दागिन्यांचे गाठोडे परत करताना अश्रु ढाळीत तो म्हणाला, "जेव्हा राजपुत्राने अनोमा नदी पार केली होती तेव्हा त्याने सर्व दागिने व राजेशाही वस्त्रे काढून टाकले व मला कपिलवस्तूस परतण्यास सूचना केली. त्याने त्याच्या उजव्या हातात तलवार घेतली व स्वत:चे सुंदर केस कापून टाकले. म्हणूनच त्यांनी संन्यासी वेश अंगीकारला आहे. जेव्हा त्यांनी त्यांच्या प्रिय घोड्यास कंठकास परत जाण्यास ईशारा केला, तेव्हा तो बिचारा पशू इतका नाराज झाला की, तो जागीच गतप्राण झाला."

छन्नने जसे हे शब्द उच्चारले तसे त्याच्या डोळ्यांत अश्रू तरळले. राजवाड्यातील प्रत्येक जण दु:खी होता परंतु यशोधराने अश्रू दाबून ठेवले. तिला माहित होते की, तीसुद्धा तिच्या पतीप्रमाणे सर्वसंगपरित्याग करुन त्याच्यासोबत जाऊ शकली असती परंतु ती तिच्या पुत्राच्या जो आता केवळ तिचाच पुत्र होता, त्याच्याप्रति असलेल्या जबाबदारीशी बांधिल होती. परंतु छन्नच्या कथनाने तिची विवेकबुद्धी हादरली व तिने स्वत:चे आयुष्य पतीप्रमाणेच जगायचे ठरवले. म्हणून तिने तिचे विलासी व सुंदर केस मुंडण केले व केशरी वस्त्र परिधान केली. तसेच तिने स्वत:ची जीवनशैली सुद्धा बदलली. ती दिवसातून एकवेळ भोजन करण्याचे व मऊ पलंगावर न झोपण्याचे पालन करु लागली तिने सर्व प्रकारच्या विलासांना निरोप दिला. तरी देखील तिने स्वत:चे सुनेचे कर्तव्य दुर्लक्षित केले नाही. तिने नेहमीपप्रमाणे निष्ठेने राणी प्रजापती गौतमी व राजा शुद्धोदन यांची सेवा केली. तसेच तिने आता तिचा प्रमुख दायित्व असलेल्या प्रिय पुत्राची राहुलची योग्य काळजी घेतली.

राजवाड्यात मर्यादित खोल्यांमध्ये ती नेहमी तिच्या पतीचा व त्याच्या सोबत व्यतित केलेल्या दिवसांचा विचार करत असे. एकदा त्या क्षणांदरम्यान तिला ऋषी असितांचे भविष्य आठवले. तिने राजपुत्र सिद्धार्थ गौतमाच्या संन्यासाबद्दलचे भविष्य ऐकले होते, जर त्याने संन्यासी होण्याचे निवडले, तर तो सम्यक सम्बुद्ध होईल. ऋषीच्या ह्या भविष्यवाणीने राजाला अस्वस्थ केले असावे व राणीला तिचा मुलगा संन्यासी होण्याचा विचार कधीच रुचला नसावा. तिने तिचे स्वयंवर चिंतिले. तिने स्मरले, कशी ती राजपुत्र सिद्धार्थ सोबत पत्नी म्हणून जुळली आणि कसे तिने त्याच्यासोबत गृहस्थी आयुष्य सुरु केले. परंतु तिला हे सुद्धा माहित होते की, ऋषींच्या भविष्यवाणीने राजपुत्राला नेहमीच पछाडले होते.

म्हणून मागील घटना यशोधरेच्या मनात पुन: संकलित झाल्या. या त्याच्या मनातील ऋषींच्या भविष्यवाणीमुळे राजा शुद्धोदनाने उघडपणे तिन्ही ऋतुंसाठी भव्य राजवाडे बांधले होते. जेथे राजपुत्र संसारिक आनंद मनमूराद उपभोगू शकेल. तिने हे साक्षिले की, त्या विलासी गोष्टीसुद्धा राजपुत्रांनी निवडलेला मार्ग रोखू शकल्या नाहीत. असितांची भविष्यवाणी खरी ठरण्याची शक्यता वाढली होती. तिला तिच्या बाळाचा जन्म आठवला. जेव्हा राजा शुद्धोदनाने आनंदपूर्वक सिद्धार्थास सांगितले की यशोधराने मुलास जन्म दिला आहे, तेव्हा तो बागेतील दगडावर विचारपूर्वक बसला. तेव्हा राजपुत्र म्हणाला होता, "माझ्या पौर्णिमेसारख्या जीवनात संन्यास घेण्याच्या संकल्पास ग्रासून टाकण्यासाठी हे बाळ राहुल (अडथळा) म्हणून जन्मास आले."

राजवाड्यात उत्सव सुरु होते. परंतु राजपुत्र सिद्धार्थास त्यांचा मुलगा जन्म अडथळा वाटला. यशोधराच्या हे लक्षात आले की, राजपुत्र अधिकाधिक उदास होता. पुन्हा एकदा राजा शुद्धोदनाला वाटले की असितांचे भविष्य अधिक खरे ठरत आहे. यशोधरा अधिकच गोंधळलेली होती. परंतु शुद्धोदन पराभव मानणारे नव्हते. त्यांनी काही अत्यंत सुंदर स्त्रियांना त्यांच्या रोमांचक नृत्याने व इतर कामुक उत्तेजनांनी राजपुत्रास आकर्षित करण्यास गुंतविले. परंतु राजपुत्र सिद्धार्थास कोणतीच गोष्ट मोहित करु शकली नाही.

राहुलची माता यशोधराने जरी सिद्धार्थाचा निर्धार नाकारला नव्हता. तरी तिला सर्व लक्षात होते. जेव्हा राजपुत्र सिद्धार्थाने त्याच्या गृहत्यागापूर्वी तिला विचारले होते, "मला सांग यशोधरा, माझ्या जगाचा त्याग करण्याच्या निर्णयाबद्दल तुला काय वाटते!" तिने उत्तर दिले होते, "हे स्वामी! तुम्ही योग्य निर्णय घेतला आहात म्हणून सिद्धार्थाला यशोधराची संमती व समर्थन होते."

जसे यशोधराला हे विचार आठवले ती आणखी गंभीर झाली. तिला माहित होते की, राजपुत्र खरेच शुद्ध मनाचा व भावनांचा आहे. राजेशाही महालात देखील ते शांत व जागरुकतापूर्वक जीवन जगले. तेव्हा सुद्धा ते संन्यासीपेक्षा कमी नव्हते. ते मनाची अशुद्धी काढून टाकू शकले व एकांतवासी

व्यक्तीचे आयुष्य जगला. त्यामुळेच तिने राजपुत्राचा महान सर्वसंगपरित्याग वाईटरीतिने घेतला नाही.

सर्वसंगपरित्यागानंतर राजपुत्र सिद्धार्थ बोधिसत्वाचे जीवन जगले. बोधिसत्त्व म्हणजे सर्वोच्य ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करणे. यशोधरेला बोधिसत्त्वाच्या उपक्रमांचा दररोज अहवाल मिळत होता. सहा वर्षांच्या कठीण तपश्चर्येनंतर बोधिसत्वाला निरंजना नदीकाठी पवित्र पिंपळाखाली ज्ञानप्राप्ती झाली हे तिला समजले. ते वाराणसीजवळ ऋषीपतन (सध्याचे सारनाथ) मध्ये मिगदायला स्थलांतरित झाल्याचे तेच तिथे त्याने त्याचे प्रथम उपदेश दिल्याचे देखील तिला समजले. त्याने त्याच्या शिष्यांना प्रोत्साहन दिले की, “भिक्षूंनो! अनेकांच्या हितासाठी, सुखासाठी व कल्याणासाठी ह्या धम्माचा उपदेश द्या व एका जागेहून दुसऱ्या जागेत चारिका करत रहा.”

ही माहिती मिळवून यशोधरा स्वत:स म्हणाली, “माझ्या सहनशक्तीस फळ मिळाले आहे. ज्याला ज्ञानप्राप्ती झाली आहे, तो सम्यक सम्बुद्ध झाला आहे व शुद्ध धम्माचा उपदेश करत आहे.”

यशोधरा राजवाड्याच्या सज्ज्यात तिच्या सात वर्षीय पुत्र राहुल सोबत उभी राहिली व कपिलवस्तूत भगवान बुद्धांच्या आगमनाची उत्सुकतेने प्रतिक्षा केली. राजा शुद्धोदनाने त्यांचा मंत्री कालुदायीस भगवंतांना श्रावस्तीहून आणण्यास पाठवले. सम्यक सम्बुद्धांनी शांततेत आमंत्रण स्विकारले होते. श्रावस्तीच्या नागरिकांनी शहर फुलांनी सजवले होते. सध्या तिने त्याला त्याच्या भिक्खूंसोबत जवळ येत असताना पाहिले, त्यांचे शिष्य त्यांचे चिवर योग्यरीतिने परिधान करुन होते. शांत व शिस्तबद्ध चाललेल्या भिक्षूंचे भगवंतांनी नेतृत्व केले. ह्या भव्य दृष्यास साक्षी होऊन यशोधराने आनंदाश्रू ढाळले. ती विचारात हरवली व स्वत:स म्हणाली, “मी सुद्धा त्याच्याब्द्दल अभिमान व आदर बाळगला पाहिजे व त्याचा आश्रय घेतला पाहिले व त्यानुसार आयुष्य जगले पाहिजे.

ती राहुलकडे वळली व त्याच्या पित्याकडे अंगुली निर्देश करुन म्हणाली (तोच आहे) ज्याच्या शरीरावर महामानवाची चिन्हे आहेत. ज्याचे किरमिजी रंगाचे पाय धम्मचक्राच्या खुणा धारण करतात. ज्याचे केस गडद काळे आहेत. ज्याचे कपाळ काचेप्रमाणे स्वच्छ आहे. ज्याच्या भुवया इंदव्रधनुष्यासारख्या आहेत. ज्याची मुद्रा पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे तेजस्वी आहे. ज्याचा मुखवर्ण गोरा आहे. ज्याचे मन पुण्य व एकाग्रतेमध्ये प्रशिक्षित झाले तो पुरुषांमध्ये सिंहाप्रमाणे आहे. तो तुझा पिता आहे.”

मातेद्वारे मार्गदर्शन केले होते, राहुल त्याच्या पित्याजवळ गेला व म्हणाला, “तुमचा सहवास किती आनंददायी आहे.”

राजा शुद्धोदन व राजवाड्याच्या इतर समर्पित सहकाऱ्यांनी त्यांना व त्यांच्या शिष्यांना राजवाड्यात आणले. त्यांना आदराने बसवले व स्वादिष्ट भोजन दिले. भोजनानंतर त्या श्रेष्ठांनी श्रोत्यांना प्रोत्साहित केले. ज्यामध्ये यशोधरा व्यतिरिक्त इतर सर्व शाक्य समाविष्ट होते.

त्यांनी यशोधरास त्यांच्यासोबत येऊन भगवंतांना अभिवादन करण्यास विनंती केली होती. परंतु तिने उत्तर दिले, “जर ते माझ्यात काही पुण्य बघतील तर ते माझ्याकडे येतील. ते इथे येतील, तेव्हाच मी त्यांना अभिवादन करेन.”

जेव्हा भगवंतांना व त्यांचे दोन शिष्य सारिपुत्त व मोगल्लान यांना याबद्दल कळले तेव्हा त्या दोघांसोबत भगवान यशोधराच्या खोलीच्या दिशेने निघाले. भगवान त्यांना म्हणाले, “मी मुक्त झालो आहे परंतु यशोधरा अजूनही मुक्त नाही. तिने मला बऱ्याच काळापासून पाहिले नाही. ती दु:खी असणाार जर ती मला स्पर्श करण्याचा प्रयत्न करेल तर तिला अडवू नका.”

जसे भगवान बुद्धांनी तिच्या खोलीत प्रवेश केला यशोधरा त्यांच्या पायांवर कोसळली व त्यांना तिच्या अश्रूंनी न्हाऊ घातले. त्यांनी तिला थांबविले नाही ती तिचे दु:ख पूर्णपणे बाहेर येईपर्यंत रडली ती विसरली की तो तिचा प्रियकर नसून सर्वोच्च (महामानव) अस्तित्व आहे. सम्यक सम्बुद्ध, सर्वज्ञ, अर्हत देवांचा व मानवांचा स्वामी आहे.

भगवान बुद्धांनी त्यांच्या पवित्र धम्माचा उपदेश दिला व तेथील उपस्थिती सोडली. राहुलमाता यशोधराने केवळ हात जोडले व त्यांना जाताना पाहिले.

**“न त माता पिता कयिरो अञ्ञे वाऽपिच ञातका।”**
**सम्मापणिहितं चित्तं सेय्यस्सो नं ततो करो।।**

(धम्मपद...43)

माता पिता किंवा दुसरे नातेवाईक जेवढे करणार नाही. त्यापेक्षा जास्त कल्याण सम्यक् प्रणिधान केलेले (स्वत:चे) चित्त करील.

मराठी अनुवाद, **-मेघा गायकवाड बनसोडे**

# धार्मिक दृष्टिकोनातून शहरांची उत्पत्ति आणि विकास महाबोधी मंदिर बोधगया च्या विशेष संदर्भात

**डॉ. निर्मला आणि डॉ. भिखारी राम यादव**
सहाय्यक प्रोफेसर, भूगोल विभाग, श्रीराम किशुन पीजी. कॉलेज, करसडा, वाराणसी.
प्रोफेसर व अध्यक्ष, दर्शन शास्त्र विभाग, मगध विश्वविद्यालय, बोधगया.

भारतासह जगातील बहुतांश नगरांच्या विकासामध्ये धार्मिक आस्थांचे (श्रद्धांचे) महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. एका शहरी वातावरणाच्या विकासामध्ये नगररुपी बीजाचे अंकुरण्यापासून ते त्याच्या पोषक अशा वातावरणात अंतरबाह्य अद्‌भूत बदल घडवून आणण्यामागे धर्माची उत्प्रेरक भूमिका राहिली आहे. धर्माने प्राचीन काळापासून स्थापित विविध नगरांच्या उत्पत्तीमध्ये महत्वपूर्ण शक्ती प्रदान केली आहे. बोधगयाचा उदय आणि विकास हा महाबोधी मंदिराची स्थापना, बौद्ध धर्माचा प्रसार प्रचार आणि यात्रेकरु यांच्या आगमनाचा परिणाम आहे. प्रस्तुत लेखांचा मुख उद्देश महाबोधी मंदिर बोधगयाची उत्पत्ती आणि विकास यावर प्रकाश टाकणे हा आहे. वर्तमानातील/सध्याच्या अभ्यासामध्ये बोधगया (बिहार) चा उदय आणि विकासाचा भौगोलिक ऐतिहासिक पैलूंच्या संदर्भात नगरांचा उगम त्याचा स्थानिक विस्तार आणि विकास यांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला गेला आहे.

## भूमिका

बहुतेक शहरांच्या विकासात धर्माची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. धर्म शहराच्या उत्पत्तीत महत्वपूर्ण शक्ती प्रदान करतात. वाराणसी, अलाहाबाद, हरिद्वार, रामेश्वरम इत्यादी नगर प्रामुख्याने धार्मिक पावित्र्यामुळे निर्माण झाली. जे ह्या ठिकाणांची ओळख आहे. प्राचीन भारतीय साहित्यानुसार - एका नगराचा विकास मंदिराच्या स्थापनेसह समृद्ध होवू शकतो. (ए.एफ.हिर्ट, 1958)[1] त्यानुसार भारतातील अशी अनेक नगर मंदिराच्या स्थापनेसह निर्माण झालीत. जसे मथुरा, वृंदावन, पुरी, कांचीपुरम, मदुराई, तिरुपती बालाजी वगैरे उल्लेखनीय आहेत. ह्या संदर्भात महान मध्ययुगीन भूगोलशास्त्रज्ञ इब्न खाल्दुन यांचे मतांचा/विचाराचा उल्लेख करता येईल.[2]

## बोधगयाची ऐतिहासिक उत्पत्ति:

बहुतेकदा धार्मिक नगराची निर्मिती कोणतीतरी पवित्र भूमी, पवित्र ठिकाण किंवा मंदिराच्या स्थापनेसह सुरुवात होते. ज्याला लोक स्वत:ची श्रद्धा आणि आस्थेचे प्रतीक मानतात बोधगयाच्या निर्मितीमध्ये बौद्ध अनुयायांची श्रद्धा आणि विश्वास, आदर समाविष्ट आहे. परंतु त्याच्या ऐतिहासिक नावा संदर्भात वेगवेगळे गैरसमज आहेत. तथापि बोधगया हे उरुवेला नावाचे एक छोटेसे लहान असे गाव होते.

उरुवेला शब्दाच्या संदर्भात वेगवेगळ्या विद्वानांची आपआपली मते आहेत. काही विद्वानांनी उरुवेला म्हणजे एक घनदाट जंगल असा अर्थ लावला[3], तर काही लोकांनी एक साधारण गाव अशी कल्पना केली[4] आचार्य बुद्धघोषांनी उरुवेलाला महावेला म्हणजे महान किनारा म्हटले आहे. जरी सिद्धार्थ गौतमाने उरुवेलाचे असे वर्णन केले होते, 'हे सैनिकी लोकांनी युक्त गाव होते व ते पुष्कळ वृक्षांनी आणि नानविध रंगाच्या फुलांनी बहरलेले होते. निरंजना नदीचा स्वच्छ निर्मल जलप्रवाह संथपणे वाहत होता. काठावर काही पक्की घरे आणि बसण्याकरीता गवताळ मैदान होते. वरिल तथ्य आणि पुराव्यावरुन हे स्पष्ट होते की, जोपर्यंत भगवान बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले नव्हते. तोपर्यंत हे नाव प्रचलित होते. परंतू, ज्ञान प्राप्ती नंतर सुद्धा ह्या नगराची अनेक नावे समोर आली, जी यात्रेकरु आणि धर्मानुयांयी यांचे कडून ठेवलेली होती. जसे **'बोधि मन्ड'** अर्थात बोधिवृक्षाच्या चहुबाजूने असलेले गोलाकार (वृत्ताकार) क्षेत्र (कलिंग बोधजातक), 'वज्रासन,' अर्थात हीरक सिंहासन (धर्मस्वामी) 'महाबोधि' अर्थात 'महान ज्ञान' (युवान-च्वाँग) इत्यादी. कनिंघम यांच्या शब्दात. बोधगया ही 19 व्या शतकाची भेट आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, भगवान बुद्धद्वारा बोधि ज्ञान प्राप्ती आहे हे ठिकाण गया शहराच्या जवळ असलेचे कारणाने याचे नाव बोधगया असे पडले.

गया व बोधगयाचा इतिहास ख्रिस्तपूर्ण आठव्या शतकापासून सुरु होतो. सुरवातीला हा द्रविड आणि व्रात्य (व्रत) सभ्यतेचे केन्द्र होते. पुरातत्व शास्त्रीय पुरावे व पुराव्यांच्या आधारानुसार 1100 ईसवी सनापूर्वी पासून येथे स्थायिक झालेले लोक शेती, शिकार आणि मासे पकडण्यासोबत तांबे वितळविण्याचे काम ही करीत होते. घरे, बांबू, बल्की (गोळे) वेळू नी बनविलेली होती. भिंती मातीच्या बनलेल्या होत्या. ह्या काळातील लोकांना केवळ लोखंडांच्या अवजारांचीच ओळख होती असे नाही तर मातीची भांडी बनविण्याचे नवे तंत्रज्ञान ही जाणत होते.

बौद्ध आणि ब्राह्मणी ग्रंथानुसार लोहयुगाच्या अंतापर्यंत बोधगया मध्ये धार्मिक यात्रेकरुंचे येणे जाणे सुरु झाले होते. सध्याचे 'बकरौर' गाव महत्वाची शहरी बाजारपेठ होती. तात्पर्य असे की, ई. सन. पूर्व 200 ते 100 ई.सनाच्या मध्यापर्यंत बोधगया महत्वाचे स्थान बनले होते. त्याच्या विकासाचा उल्लेख मिळालेल्या पुराव्यांच्या आणि निरीक्षणांच्या आधाराने वेगवेगळ्या टप्प्यात करता येईल.

क) प्राचीन काळ (1972 ते 1947)
ख) वसाहत (औपनिवेशिक) काळ (1982 ते 1947)
ग) स्वातंत्र्योत्तर काळ (1947 ते 1980)
घ) 1980 च्या नंतर (1980 ते 2006)

**प्राचीन काळ**

बोधगयाला एक धार्मिक स्थळ म्हणून विकसित होण्यास बराच काळ लागला. कारण, ज्ञान प्राप्तीनंतर भगवान बुद्धांच्या येथील कमी वास्तव्यामुळे हे स्थान दुर्लक्षित राहिले. (ज्ञान प्राप्तीनंतर भगवान बुद्ध येथे फार काळ न राहिल्यामुळे हे स्थळ दुर्लक्षित राहिले). याचा परिणाम याचा विकास काळानुरुप होवू शकला नाही. तरी श्रावस्ती, राजगीर, वैशाली व कौशंबी ह्या ठिकाणी भगवान बुद्धांच्या वारंवार भेटीमुळे आणि मुक्कामामुळे मठांच्या वाढीला प्रोत्साहन चालना मिळाली. 483 ई.स.पूर्वी यशच्या प्रवास वर्णनात उत्तर भारतातील विविध मंदिरांची आणि मठांची माहिती मिळते. परंतु बोधगया संबंधी कोणताही उल्लेख मिळत नाही.[10]

इ.स.पूर्व तिसऱ्या शेवटच्या काळात सर्वप्रथम मौर्य वंशाचा शासक सम्राट अशोकाने बौद्ध धर्म ग्रहण केल्यानंतर बोधिवृक्ष व ज्ञानप्राप्तीच्या स्थळावर लहान लहान स्मारके बांधून त्यांना संरक्षण देण्यात आले. तसेच विश्वातील अनेक देशात भ्रमण करीत प्रचार-प्रसार केला. त्यामुळे बोधगयाची प्रसिद्धी दूरपर्यंत पसरली.[11] परिणामी बौद्ध धर्मानुयायींचे आवागमन सुरु झाले. अशोकानंतर अनेक शासनकर्त्यांकडून ते पिढ्यान पिढ्या वाढत गेले. चौथ्या शतकात कुशाण शासनकर्त्यांनी/राज्यकर्त्यांनी भव्य अशा मंदिराची स्थापना केली आणि प्रथमच मंदिराच्या गर्भगृहा-मध्ये भगवान बृद्धांची मूर्ती (प्रतिमा) स्थापित केली. पाचव्या शतकाच्या अंतापर्यंत/शेवटापर्यंत मंदिरांसह इतर अनेक स्मारके व मठ बांधण्यात आले जे बौद्ध भिक्खु आणि यात्रेकरु यांच्या वाढत्या संख्येचे प्रतीक होते.[12] याप्रकारे सातव्या शतकापासून ते अकराव्या शतकापर्यंत बोधगयाचा इतिहास भरभराटीचा राहिला. गुप्तवंशाच्या पुष्यभूति हर्षवर्धनाच्या शासन काळात बोधगयेला विशेष असे संरक्षण मिळाले. चीनी प्रवासी ह्यु एन त्संग यांच्या शब्दात, "गुप्तकाळात बोधगया हे एक उत्पन्नाचे मोठे साधन होते." अनेक बौद्ध विहार व मठ बांधण्यात आले. बौद्ध परंपरेनुसार साजरे केले जाणारे सण-उत्सव हे यात्रेकरुं करिता प्रमुख आकर्षणाचे केंद्र होते. कारागीरीची कामे, दगडांवर दानकर्त्यांची नावे कोरण्याचे काम, स्मारक बांधण्याची कामे, पहारेकरी आणि माळी यांचे काम हे लोकांचे प्रमुख व्यवसाय होते. वार्षिक उत्सवात मोठ्या प्रमाणात फुलांचा पुरवठा केला जात असे आणि यात्रेकरुंच्या भोजनासाठी तांदूळ पिकविला जात असे/तांदळाचे उत्पन्न घेतले जात होते. अशाप्रकारे पालवंशाच्या राजांच्या शासन काळात बौद्ध तीर्थांची ख्याती/प्रसिद्धी दूर दूर पर्यंत पसरली. अकराव्या शतकाच्या शेवटपर्यंत बोधगयाचा विकास अत्यंत झपाट्याने होत गेला.[13] परंतू 12 व्या शतकाच्या शेवटी बोधगयाच्या सामाजिक जीवनात मोठे परिवर्तन झाले. बोधगया मुस्लिम सत्ताधाऱ्याच्या अधिन झाली. ई.सन. 1197 मध्ये बख्तियार खिलजीच्या आक्रमणानंतर ते पूर्णपणे नष्ट झाले, त्याचा प्रभाव येथील सामाजिक अर्थव्यवस्थेवर झाला. बोधगयेत मुस्लिम सत्ता आल्यानंतर शैवसंप्रदायाच्या महंतानी मंदिर आपल्या ताब्यात घेतले आणि ही परिस्थिती सुमारे 300 वर्षापर्यंत राहिली.[14]

**वसाहतकाळ (औपनिवेशिक काळ):**

सन 1774 मध्ये बंगालमध्ये इंग्रज सत्तारुढ झाल्यानंतर पुरातत्वशास्त्राच्या प्रेमामुळे इंग्रजांचे लक्ष भारतीय संस्कृतीकडे वेधले गेले. या सुरवातीच्या शोधामध्ये सन 1785 मध्ये बोधगया प्रथम लक्षात आली.[15] इंग्रजांचे शोधकार्य अनेक वर्षापर्यंत चालू होते. शोधकार्यातून मिळालेली माहिती प्रसिद्ध करण्यात आली. ज्याचा प्रसार-प्रचार सर्व जगात झाला. या दरम्यान अनेक ब्रिटिश कलाकार, सर्वेक्षक, कारागीर आणि पुरातत्वशास्त्रज्ञांनी अभ्यासासाठी बोधगयाकडे प्रवास केला. या प्रवाशांमध्ये विलियम आणि डोनियल ने 1790 मध्ये मंदिराचे पहिले रेखाचित्र बनवून (रेखाटून) महत्वपूर्ण योगदान दिले.[16] ब्रिटिशांच्या अधिपत्या खालील बर्मी राजा मिन्डोन मिन ने सन 1874 मध्ये एका मिशन अंतर्गत मंदिराच्या जिर्णोद्धार करण्यासाठी तत्कालीन सरकारकडे परवानगी मागितली. परंतु संवर्धनाचे महत्व माहित नसल्याने मंदिराचे मूळ स्वरुप नष्ट होत चालले होते. परिणाामी ब्रिटिश सरकारने उत्खनन आणि संवर्धनाचे काम पुरातत्व शास्त्रज्ञ ॲलेक्झांन्डर कनिंघहॅम यांचेकडे सोपवले. ॲलेक्झान्डर कनिंगहॅमने जे.डी.एम. बेगलर यांच्या मदतीने ह्यू एन त्संग च्या

स्थळ (साईट) विश्लेषणाच्या आधारे संपूर्ण योजने अंतर्गत सन 1884 मध्ये मंदिराचे बांधकाम पूर्ण केले.[17] यावेळी बोधगया तीन समृद्ध गावांनी वेढलेले होते. उत्तरेला हरिहरपूर, पश्चिमेला धन्धवा, भलुवा, तूरी, दक्षिणेला रामपूर आणि पूर्वेला निरंजना नदी नैसर्गिक सीमा म्हणून अस्तित्वात होती. त्याचा अक्षांशीय विस्तार $240^{2}$'14" उत्तरेला आणि रेखांशाचा विस्तार $85^{0}$ 2'14" पूर्व होता. हा दोन सडक मार्गाने प्रवेश करण्यायोग्य होता. ज्यामधील एक रस्ता जून्या टाकीच्या रस्त्याला तर दुसरा नवीन रस्ता शेरघाटीला जोडला होता. सरकारी महसुली नोंदीनुसार बोधगयाची गणती बोधगया मुख्य, मस्तीपूर व ताराडीह ही दोन गावे जोडून करण्यात आली होती. सुरवातीला त्याचे एकुण क्षेत्रफळ 2152.76 एकर होते जे नंतर वाढून 2800.27 एकर झाले. ही दोन्ही गावे सुपिक मैदानी होती. येथील एकुण लोकसंख्या 3,050 होती. त्यामध्ये 1,582 पुरुष व 1468 महिला होत्या (जणगणना 1872). धर्मानुसार मुस्लिमांपेक्षा हिंदूची संख्या जास्त होती. [18]

19 व्या शतकापर्यंत मंदिराचा ताबा सुरक्षित हातात नसल्या-कारणाने मंदिर पुन्हा दयनीय अवस्थेत पडले. त्याचे स्थितीबद्दची चर्चा एडविन अरनोल्ड यांनी "द लाईट ऑफ एशिया" नावाच्या पत्रिकेत केली आहे. सन 1891 मध्ये अनागारिक धर्मपाल यांनी महाबोधी सोसायटीची स्थापना केली. विश्रामगृहाची ही स्थापना केली. सन 1899 मध्ये आंतरराष्ट्रीय सम्मेलन (परिषद) आयोजित केले हे आयोजन मंदिराचे जतन करण्यासाठी आणि शहराच्या विकासासाठी वरदान ठरले. परिणामी अनेक देशाच्या सहकार्याने जपानी बौद्ध विहार (1976), तिबेटीयन बौद्ध विहार (1938) बिर्ला धर्मशाळा (1934), बर्मी बौद्ध मंदिर आणि अतिथीगृह (1936), गेल्लुप्पा मठ (1947), शाई बौद्ध मंदिर (1957), चीनी मंदिर (1945) इत्यादी देशांचे मंदिर व मठ बांधण्यात आले. नगर विकासाची बहुतांशी कामे मंदिर परिसरापर्यंत मर्यादित होती. हा विकास त्यावेळी जास्त प्रभावी झाला (किंवा-ह्या विकासावर त्यावेळी अधिक परिणाम झाला ज्यावेळी) ज्यावेळी 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात गया मध्ये वाहतूक आणि दळणवळणाची साधने विकसित झाली. परिवहन व दळणवळण क्षेत्रात झालेल्या संरचनात्मक विकासामुळे बोधगयाच्या धार्मिक वातावरणात विलक्षण बदल झाला. सर्वप्रथम 1876 मध्ये गया आणि पाटणा दरम्यान पहिला रेल्वेमार्ग टाकण्यात आला. 19 पुन्हा 1895 मध्ये हा दक्षिण विहाराच्या रेल्वे मार्गाला जोडला. त्यानंतर सन 1906 मध्ये पूर्वोत्तर रेल्वेशी सुद्धा जोडला गेला. प्रवास सुलभ झाल्याने तीर्थयात्री पर्यटकांना येणे जाणे सोपे झाले. त्यामुळे ह्या परिसराचे चित्र पालटले. विसाव्या शतकाच्या सुरवातीला बोधगयाची मूळवस्ती महाबोधी मंदिर व मठ आकारासह स्वयं परिभाषित झाले होते.

**स्वातंत्र्योत्तर काळ:-**

स्वातंत्र्यानंतर बोधगयाला महत्वाचे असे स्थान प्राप्त झाले. 19 जून 1949 रोजी केंद्र सरकारने **'बोधगया मंदिर ॲक्ट 1949'** कायदेशीररित्या मंजूर केला. त्यामध्ये मंदिराची देखभाल करण्याचे काम बौद्धांकडे सोपविण्यात आले. सुरवातीला बोधगया काही फर्लांगात पसरलेले होते त्यात वाढ होवून 1956 मध्ये 5 चौ.कि.मी. झाले. त्यावेळी नगराची एकूण लोकसंख्या 4,678 नागरीक होती (जनगणना 1951). 1956 मध्ये भगवान बुद्धाच्या 2500 व्या जयंतीमध्ये तीर्थयात्री पर्यटकांच्या संख्येमध्ये आश्चर्यजनक वाढ झाली. ह्या वाढीमुळे नगराच्या विकासाला चालना मिळाली. म्हणून 1956 मध्ये पहिली राष्ट्रीय योजना कार्यान्वित करण्यात आली त्यामुळे, अंतर्गत एक विलक्षण बदल घडला जसे रस्त्यांची दुरुस्ती. केंद्रीय अतिथी गृहाची स्थापना, पुरातत्व संग्रहाल डाक बंगला, रेस्टॉरंट, पार्क इत्यादीची निर्मिती झाली. मंदिराभोवती सार्वजनिक सेवा व परिक्रमा मार्ग बनविल्यामुळे पर्यटनाच्या विकासासोबत नगर विकासालाही गती मिळाली व तीर्थयात्री पर्यटकांच्या संख्येत अभूतपूर्व अशी वाढ झाली. सन 1961 मध्ये नगराची सीमा 11 चौ.कि. मीटर ने वाढली व या वाढी बरोबर हे नगर घोषित करण्यात आहे. नगराची एकूण लोकसंख्या 6,299 नागरिक झाली (जनगणना 1961) सन 1962 मध्ये मगध विश्व विद्यापिठाची स्थापना झाली. सोबतच अनेक आंतरराष्ट्रीय संस्था मठ आणि सामुदायिक सेवाही वाढल्या. त्यामुळे व्यवसायाच्या उद्देशाने बोधगयेचे आकर्षण व्यापाऱ्यांमध्ये झपाट्याने वाढले, ज्यामुळे प्रवाशांच्या (प्रवासी लोकांच्या) संख्येत वाढ झाली. परिणामी मूलभूत विकासाला समर्थन प्राप्त झाले. विकास आणि वाढीचा परिणाम म्हणजे 1970 च्या अखेरीस ह्या नगराला' तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले. 1971 ते 1981 च्या कालावधीतील +125.66 प्रतिशत लोकसंख्या वाढ नोंदविली गेली.

**1980 च्या नंतर:-**

बोधगयाच्या विकासात पर्यटकांची भूमिका वाखाण-ण्यासारखी राहिली आहे. येथे राज्य आणि केंद्र सरकारच्या सहयोगाने 80 च्या दशकाच्या मध्यात येतील पर्यटन झपाट्याने वाढले. 1984 मध्ये राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना पर्यटन विकासाकरीता महत्वाची ठरली. ज्याचे अंतर्गत बिहार राज्य पर्यटन विकास महामंडळ स्थापन झाले. सातव्या पंचवार्षिक

योजनेमध्ये पर्यटनाला विशेष महत्व दिले गेले. ज्यामध्ये पर्यटन विकासाकरिता राज्य सरकारांना जास्तीत जास्त निधी देण्यात आला. त्यामुळे बोधगथा मध्ये पर्यटक डाक बंगला, राज्यस्तरीय पर्यटक अतिथीगृह, रेस्टॉरंटस्, तिकिट खिडकी (कॉउन्टर) पर्यटन सूचना/केंद्र, रेलवे आरक्षण कार्यालय आणि भारतीय स्टेट बॅक यांची स्थापना झाली. परंतू 1985 मध्ये बौद्ध पर्व कालचक्र पूजेकरिता आलेल्या पर्यटकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाल्याने प्रांतीय व प्रशासकिय स्तरावरुन दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा अपयशी ठरल्या परिणामी जपानी बौद्ध धम्म अनुयायांनी सुविधांच्या विकासाकरिता खूप काम केले. तसेच शहराच्या विकासाकरिता अनेक विकासाच्या योजना सादर केल्या परंतु काही अडथळ्यांमुळे त्या अपयशी राहिल्या. सन 1981 मध्ये बोधगया नगर नियोजन प्राधिकरणांमार्फत 20,000 लोकसंख्येसह पहिला मास्टर प्लॅन तयार केला. योजनेचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच पुन्हा त्यात संशोधन करुन नविन मास्टर योजना बनिविण्यात आली. ज्यामध्ये विशेष करुन हरित क्षेत्राच्या विकासावर भर दिला गेला. जसे हरित उद्यान, हरिण पार्क, साधना पार्क, सडक मार्गावर सघन वृक्षारोपन इत्यादी. वर्ष 1881 मध्ये नगर अधिसुचित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले. परिणामी 1981 ते 1991 च्य दरम्यान +37.72 प्रतिशत वाढीसह लोकसंख्या 21,690 नागरीक झाली व शहराचे क्षेत्रफळ 17 चौ.कि. मीटर झाले. वर्ष 2002 मध्ये यूनोस्कोद्वारा महाबोधी मंदिराला अंतराष्ट्रीय वारसा म्हणून दर्जा मिळाल्यानंतर भारत सरकार पर्यटन मंत्रालयाने पूर्वीच्या प्रस्तावित योजनेमध्ये पुन्हा फेरफार केला आणि ह्या नविन योजनेमध्ये 'वारसा संवर्धनावर विशेष लक्ष देण्यात आले व पूर्वीच्या पहिल्या योजनेचे आवश्यक बाबींचा समावेश करुन एक नविन विकास योजना तयार केली. ह्या योजनेचा मुख्य उद्देश संरक्षणप्रती जागरुकता आणणे, सामाजिक जबाबदाऱ्या पर्यावरणास अनुकूल यशस्वी स्थानिक विकास व अद्वितीय अशे वैशिष्ट्ये प्राप्त करणे हे यांचा समावेश होता. तरी शहराच्या दीर्घकालीन विकासाकरिता **"नगर विकास"** मार्फत 2010 ते 2030 पर्यंतच्या प्रस्तावित नगर विकास योजना तयार केली. ज्यामध्ये नगर गुंतवणूक योजना सुद्धा समाविष्ट आहे. ही विकास योजना ब्रिटिश सर "संवर्धन परियोजना" अंतर्गत तयार केली आहे, ज्यामध्ये आर्थिक सुधारणावर भर दिली गेला आहे.

शहरी विकास आणि मंदिराचे संरक्षणाकरिता अनेक समित्या, संस्था आणि एजन्सीज काम करीत आहेत. ज्यामध्ये मंदिर व मंदिराचा चोहो बाजूचा परिसर "बोधगया मंदिर व्यवस्थापन समिती" च्या अधिकारात आहे. ही समिती बिहार राज्याच्या नियंत्रण, पर्यवेक्षण व निर्देशानानुसार कार्य करते. ज्यामध्ये मंदिराच्या बाह्य देखभालीसह मंदिर परिसराच्या आतील सर्व विकास कामे करते. त्यांच्या परवानगी शिवाय शहरात मंदिरापासून एक ते दोन कि.मी. पर्यंत कोणतेही बांधकाम करता येत नाही. तर महाबोधी मंदिर व प्राचीन स्मारकांना प्राचीन स्मारक आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष अधिनियम 1958 तसेच राज्य पुरातत्व स्थळे आणि स्मारके संरक्षण आणि कलानिधी अधिनियम 1976 नुसार संरक्षण प्राप्त आहे. तर बोधगया नगर पंचायत ही नगराच्या विकासाकरिता उत्तरदायी आहे. 74 व्या घटना दुरुस्ती आणि बिहार अधिनियम ॲक्ट 1922 नुसार त्याचे हे अधिकार प्राप्त झाले आहेत. कोणतीही शहरी विकास योजना बांधकाम योजना किंवा भूमी वापरामधील कोणत्याही बदलासाठी नागरिकाला बोधगया नगर पंचायतीची परवानगी घेणे आवश्यक आहे. शहरी हद्दी बाहेरील जमीनीच्या वापरा संबंधीच्या मुल्यांकनास नगर पंचायत जबाबदार असते. ह्या मूलभुत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच महसूल वसूल करणेची कामे सुध्दा करते. स्थानिक संस्था जशा मठ, ट्रस्ट व संगठन संस्था ह्या शहराची अर्थव्यवस्था व नियोजन ठरविण्यात महत्वाची भूमिका बजावतात. शहराच्या विकासामध्ये यांचा महत्वपूर्ण असा सहभाग असतो. वर्तमान काळात बोधगया हे भारताच्या नकाशावर आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळांच्या रुपात अस्तित्वात/ विद्यमान आहे. येथे अनेक व्यवसायिक उपक्रम सुरु आहेत. परिणामी विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या ज्यामुळे आजूबाजूच्या भागांमधून शहरी प्रवासामध्ये वाढ झाली आहे. वर्ष 1991 मध्ये नगराची लोकसंख्या मात्र 4,678 इतकी झाली तसेच क्षेत्रफळ 1872 मध्ये 5 चौ. कि. मी. ने वाढून 2011 मध्ये 19.38 चौ. कि. मिटर झाली. येथे दरवर्षी लाखो तीर्थयात्री पर्यटक भेट देतात/येतात. गेल्या काही वर्षापासून क्रमशः झालेल्या विकासाचा परिणाम वर्तमानातील शहराच्या स्वरुपात प्रतिबिंबित आलेला आहे.

**संदर्भ ग्रंथाची यादीः-**


1) सांकृत्यायन, प. राहुल (1964), 'मज्झिम निकाय' महाबोधि सभा, सारनाथ, वाराणसी, पृ. 106.

2) शान्ति, भिक्षु शास्त्री (1984), 'ललित विस्तार' उ.प्र. हिन्दी संस्थान, लखनऊ पृ. 31.

3) Asiatic Researchs. Vol. I.P. 284.

4) Eastern Monachism Ni. 3, P.213.

5) Turnori's Mahanso, P.2

6) Tip://www.buddhanet.Net/bodh. gaya /bodh-Gaya OI.him.

7) Ansari, A.Q. 1990, Archaeological Rem ains of Bodh Gaya, Ramanand Vidya Bharvan, Delhi, pp:44-51.

8) http://www.bodhgayanews.nets/history. htm.

9) Barua, B.M. (1934)., Old Shrines at Bodhgaya Calcutta P-21.

10) धनौआ, बेलिदर आणि हरिहर (1980) 'ह्यु एन त्संग की भारत यात्रा' नॅशनल बुक ट्रस्ट, भारत.

11) Beal's (1881), Indian T1980ravels of Chinese. Buddhists,in Indian Antiquary, Vol. 10P 44.

12) Roerich, G. (1959), Biograpy' of Dharma Svamin, Patna K.P. Jayaswal Research Institute.

13) बौद्ध शान्ति स्वरुप (2005) बोधगया सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली पृ. 29

14) Bodh Gaya Relighting the Lamp-Bod Gaya from 1420 to the Present.

15) Trevithick, A (2006), "The Revival of Buddhist Piligrimage at Bodhgaya (1811-1949)" Motailal Banarsidas, Delhi. P.8.

16) City Development plan and HDCO Report (2006). Govt. of Bhihar, P.4.

17) Guha, Thakurta, T (2004) Monuments, Objects, Histories. Institutions of Art in colonial and Postcolonial India" Published by Columbia. University, Mew York.

18) Singh, Jagdish (1964) "Transport Geography of South Bihar" NGSI, Varanasi, P55.

19) Geary David (2009) "Destination Enlightenment: Budhism and the Global Bazar in Bodhgaya, Bihar", Published Thesis, University of British Colombia, P.19.

20) Chaudhary, P.C. Rai (1957), "Bihar District Gazetteers Gaya." Patna Secretariat Press, P. 224

21) Singh, Rana P.B. (2009) Cosmic Order and Cultural Astronomy : Sacred Cities of India" Published by Cambridge Scholars, P. 82.


मराठी अनुवाद -**अरुण वाघमारे**

## धम्म अज्झयन चारिका

| | | |
|---|---|---|
| मे 2022 | :- | 14 मे ते 27 मे (बोधगया, सारनाथ, श्रावस्ती, लुम्बिनी, कपिलवस्तू, कुशीनगर, वैशाली, नालंदा, राजगिर, डुंगेश्वरी |
| सप्टेंबर 2022 | :- | 25 सप्टेंबर से 2 ऑक्टोबर (हिमाचल प्रदेश, कुलू मनाली, धर्मशाळा) |
| ऑक्टोबर 2022 | :- | 6 ऑक्टोबर से 13 ऑक्टोबर (श्रीलंका) |
| ऑक्टोबर 2022 | :- | 22 ऑक्टोबर ते 5 नोव्हेंबर (बोधगया, सारनाथ, श्रावस्ती, लुम्बिनी, कपिलवस्तू, कुशीनगर, वैशाली, नालंदा, राजगिर, डुंगेश्वरी) |
| नोव्हेंबर 2022 | :- | सांची महोस्तव 24 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर (सांची, महू, सतधारा, सोनारी, मुरेलखुर्द, अंधेर) |

## बुद्ध धम्मातिल आठ अद्भुत गुण

- उपासिका : आर. तुलि

भगवान बुद्ध श्रावस्ति येथील मिगारमाताच्या पुर्वाराम प्रासादामधे (विहारामधे) विहार करीत असतांना एके वेळी उपोसथाच्या दिवशी भगवान भिक्खु संघासह प्रासादात बसले होते तेव्हा रात्र संपता संपता आयुष्यमान आनंद भगवंताजवळ येऊन हात जोडुन भगवंतास म्हणाले - भंते रात्र संपत आहे. पहीला प्रहर संपलेला आहे. प्रातिमोक्ष उपदेश प्रवचन ऐकण्याकरीता भिक्खु संघ आपली प्रतीक्षा करीत थांबलेला आहे. कृपा करुन चला आणि भिक्खु संघाला प्रतिमोक्षावर प्रवचन द्या.

उत्तरा दाखल भगवान् अबोल राहीले काहीच बोलले नाही.

रात्रीचा दुसरा प्रहर देखील संपला भगवंत आले नाही तेव्हा आयुष्यमान आनंद पुन्हा त्यांच्या जवळ आले दुसऱ्या वेळी भगवंताच्या समोर हात जोडुन म्हणाले -

भंते रात्रिचा दुसरा प्रहर सुद्धा संपला आहे भिक्खु संघ खुप वेळेपासुन आपल्या प्रवचनाच्या प्रतिक्षेत बसलेला आहे. कृपा करुन प्रातिमोक्ष प्रवचन द्या .

उत्तरादाखल भगवंत पुन्हा अबोल राहीले काहीच बोलले नाही .

रात्रिचा अंतीम प्रहर सुद्धा संपला तरीही भगवंत सभागारात आले नाहीत तेव्हा तिसऱ्यांदा आयुष्यमान आनंद पुन्हा भगवंतांजवळ येऊन हात जोडुन म्हणाले -

भंते रात्रिचा अंतीम प्रहर सुद्धा निघुन गेला, सुर्य उगवत आहे पहाट झाली आहे भिक्खु संघ खुप वेळेपासुन आपली प्रतिक्षा करीत बसलेला आहे कृपा करुन भिक्खु संघाला प्रातिमोक्षावर प्रवचन द्या.

त्यावर भगवान म्हणाले, आनंद ! 'ती परिषद शुद्ध नाही आहे'.

जेव्हा आयुष्यमान मोग्गलान यांनी हे ऐकले तेव्हा ते विचार करु लागले की कोणत्या व्यक्तिबाबत भगवान म्हणाले असावे की परीषद शुद्ध नाही आहे.

तेव्हा आयुष्यमान मोग्गलान यांनी ध्यान लावून चित्ताद्वारे भिक्खु संघाला पाहीले असता आयुष्यमान मोग्गलान यांचे ध्यान त्या व्यक्तिवर गेले जो दु:शील, दुराचारी, आतुन विकृत, लपुन दुष्कर्म करणारा, अश्रमण असुन श्रमण असल्याचा दावा करणारा, अब्रम्हचारी असुन ब्रम्हचारी असल्याचा दावा करणारा अश्या दु:शील व्यक्तिस संघामधे बसलेले पाहीले. जिथे तो पुरुष बसलेला होता महामोग्गलान तेथे गेले आणी त्या पुरुषास म्हणाले-

आवुस उठ भगवंतांनी तुला बघीतले आहे तु ह्या भिक्खुसंघामधे बसु नाही शकत. ह्या प्रमाणे आयुष्यमान महामोग्गलान त्या पुरुषास दुसऱ्यांदा तिसऱ्यांदा म्हणाले असता तो दुराचारी पुरुष चुपचाप बसलेलाच राहील्यावर आयुष्यमान महामोग्गलान यांनी त्या दु:शील पुरुषाचा हात पकडुन त्याला उठवले आणी मुख्य दरवाजाच्या बाहेर हाकलुन दिले. आणि आतुन दरवाजा बंद करुन भगवान बुद्धांजवळ जाऊन म्हणाले - भगवंत मी त्या दुराचारी पुरुषास संघा बाहेर काढुन दिलेले आहे परिषद आता शुद्ध आहे भन्ते भगवान कृपया भिक्खु संघाला प्रातिमोक्षावर प्रवचन द्या. त्यावर भगवान म्हणाले आश्चर्य आहे मोग्गलान तु त्या दुराचारी पुरुषास ओळखुन हात पकडुन काढुन दिलेस तो मलीन गेला. तेव्हा भगवान भिक्खु परिषदेत आले व भिक्खु संघाला सम्बोधित केले .

भिक्खुंनो, ( बुद्ध ) धर्माचे आठ अद्भूत गुण आहेत. ( बुद्ध ) धर्म महासमुद्रा समान आहे ज्यात वेगवेगळे आठ अद्भूत गुण आहेत ज्यास पाहून देवतागण, असुरगण प्रसन्नतापूर्वक विनय, धर्मात विहार करतात .

**आठ अद्भुत गुण**

1) महासमुद्र किनाऱ्यावर खोल नसतो क्रमाने आतमध्ये अधिकाधीक खोल होत जातो .खाली जातो. वाकलेला असतो . अथांग खोल असतो. हा महासमुद्राचा पहीला अद्भुत गुण आहे. ज्यास पाहून असुर, देवतागण प्रसन्नतापुर्वक अशा महासमुद्रात विहार करतात.

ह्याच प्रमाणे धर्म विनयाचे आठ अद्भुत गुण आहेत. ज्यास पाहून माझे शिष्य धर्म विनयात रमण करतात. जसा महासमुद्र किनाऱ्यावर खोल नसतो क्रमाक्रमाने अथांग (खोल) होत जातो. ह्याच प्रमाणे बुद्ध धर्म विनयात क्रमश: शिक्षा, क्रिया , मार्ग आहे .

एकदम प्रारंभीच साक्षात्कार नाही आहे. ह्या प्रकारे बुद्ध धर्म अद्भुत धर्म आहे अद्वितीय धर्म आहे . यास क्रमाक्रमाने पायरी पायरीने समजल्यानंतरच आपल्या अंत:करणाला बदलवू शकता. अंतकरण बदलल्या नंतरच आचरण बदलते. आचरण बदलण्याचा हेतु आहे शील युक्त होणे, ज्याच्या आचरणात शील आहे, प्रेम आहे,

करुणा आहे अशा व्यक्तीस मुक्तिचा निर्वाण मार्गाचा साक्षात्कार होतो. ह्या प्रकारे (बुद्ध धम्माच्या महासागरात) धर्माला समजणारे असुरगण, देवतागण प्रसन्नपणे धर्मात रमण करतात .

2) महासमुद्राचा स्थिरधर्म आहे, किनाऱ्याला न सोडणे किनाऱ्याला महासमुद्र सोडत नाही ह्याच प्रकारे बुद्ध धम्मात श्रावकां (शिष्य) करीता शील आचार नियम निहीत केलेले आहेत. प्राणांकरीता देखील माझे शिष्य शील आचार नियमांचे उल्लंघन करीत नाहीत .

3) भगवान पुढे म्हणाले की महासमुद्र मृत शरीराला आपल्या सोबत ठेवत नाही मेलेल्यास महासमुद्र लगेच किनाऱ्यावर फेकुन देतो. त्यास बघून असुर, देवतागण प्रसन्नपणे रमण करतात. ज्याप्रमाणे मृत शरीरास महासमुद्र लगेच किनाऱ्यावर फेकुन देतो त्याचप्रमाणे जो व्यक्ति व्यभिचारी आहे, दु:शील आहे, लपुन छपुन दुष्कर्म करणारा आहे. अश्रमण असुन श्रमण (भिक्खु)असल्याचे ढोंग करतो. अब्रह्मचारी असुन ब्रह्मचारी असल्याचा दावा करतो. अशा व्यक्तीस संघ आपल्या सोबत ठेवत नाही. संघ त्याचेसोबत राहत नाही. संघ एकत्रीत होऊन त्यास संघाच्या बाहेर काढून देतो जर असा दु:शील व्यक्ति संघामधे बसलेला असला तरी तो संघापासुन दुरच आहे आणी संघ त्याच्यापासुन दुर आहे .

4) भगवंतानी सांगितले की मोठमोठ्या नद्यां जसे गंगा, यमुना, सरस्वती, सरयु घागरा आदी महासमुद्रात जाऊन मिसळतात आणी महासमुद्रात मिसळल्याने आपले नांव अस्तित्व सोडुन देतात आणी महासमुद्राचे रुप धारण करतात, महासमुद्र बनतात. अशाच प्रकारे भिक्खुंनो क्षत्रीय, ब्राह्मण, वैश्य, शुद्र हे चार वर्ण तथागतांद्वारे सांगितलेल्या धर्म विनयामधे बेघर प्रवज्जित झालेला (श्रमण) व्यक्ति संघामधे प्रवेश मिळाल्यापासून आपले नांव, गोत्र सोडून देतो आणि श्रमण (भिक्खु) च्या नावांने प्रसिद्ध होतो हे पाहून असुर, देवतागण प्रसन्नतापुर्वक धम्मरुपी महासागरात रमण करतात .

5 ) जगात जेवढ्या काही वाहणाऱ्या पाण्याच्या धारा समुद्रात जातात. आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या आकाशधारा समुद्रात पडतात त्यामुळें समुद्राचे पाणी कमी किंवा जास्त होत नाही. शिलवान व्यक्ति असो, निर्वाण मार्गारुढ असो, अथवा निर्वाण पद प्राप्त असो बुद्ध धम्मात निर्वाण पदात कमी अथवा अधीकता दिसत नाही अशा बुद्ध धम्मात देवतागण प्रसन्न होऊन रमण करतात.

6) महासमुद्र एक रस आहे. खारटपणा त्याचा एक रस आहे त्याच प्रकारे बुद्ध धम्म एक रस आहे भावना, ध्यान, निर्वाण, मुक्ति हे त्यातील एक रस आहेत ज्यात असुर, देवतागण प्रसन्न होऊन ह्या बुद्ध धर्म विनयात अभिरमण करतात .

7) भगवान बुद्ध पुन्हा म्हणाले भिक्खुंनो महासमुद्रात पुष्कळ रत्न आहेत वेगवेगळ्या प्रकारचे रत्न जसे हीरा, मोती, मणि, सोने, चांदी, मूंगा, रक्तवर्ण मणि आदी ह्याच प्रकारे बुद्ध धर्म विनयात पुष्कळसे अनेक प्रकारचे रत्न आहेत जसे पंचशील, भावना, ध्यान, चार आर्य - सत्य आदि निर्वाण प्राप्ति करीता बहुमुल्य रत्न आहेत अशा बुद्ध धर्म विनयात देवतागण प्रसन्न होऊन अभिरमण करतात.

8) भगवान् महासमुद्राचा आठवा गुण सांगतांना म्हणाले महासमुद्र महान प्राण्यांचे निवास स्थान आहे जसे तिमीर , पिंगल , असुर, नाग, गंधर्व आदि महासमुद्रात शंभर योजन वाले शरीरधारी सुद्धा आहेत, दोनशें योजनवाले ... तिनशे योजनवाले .... चारशे योजनवाले ..... पांचशे योजनवाले शरीरधारी सुद्धा आहेत. अशाप्रकारे महासमुद्र महान प्राण्यांचे निवास स्थान आहे जसा महासमुद्र महान प्राण्यांचे निवास स्थान आहे त्याच प्रकारे धर्म विनय बुद्ध - धम्मात महान प्राण्यांचे निवास स्थान आहे . इथे प्राणी निर्वाणाचा साक्षात्कार करुन श्रोतापत्ती फल मार्ग प्राप्त करतो, निर्वाणाला प्राप्त करतात, अर्हत्व फलाचा साक्षात्कार करुन मार्गाला प्राप्त करतात. अर्हत्व प्राप्त होतात त्यांना पाहून असुर, देवतागण प्रसन्न होऊन बुद्ध-धर्म विनयात अभिरमण करतात.भगवान म्हणतात जो व्यक्ति महासमुद्रा सारख्या धर्म विनयात बुद्ध-धर्माची व्यापकता महानता समजतो त्या व्यक्तीचे अशुध्द विचार, वाईट विचार, मलीन आचार-विचार धुऊन जातात, शुध्द होतात अशा व्यक्तीचे आचरण बदलुन अंतकरण परीशुध्द होऊन जाते तो व्यक्ती शील सम्पन्न होऊन अंतकरणात आतुन नम्र होतो. जसे की वृक्षाची फांदी फळांनी झुकते. ह्याच प्रकारे शिलवान व्यक्ति आतुन शुध्द होऊन अहंकाराला सोडुन देतो अथवा अहंकार स्वत: गळुन जातो आणि अहंकारातुन मुक्त झालेल्या व्यक्तिस मान-अपमान समान होऊन जातात मणि, मुक्ता, हीरा, मोती, सोने, चांदी, मूंगा इत्यादी रत्न सांसारिक जीवनात व्यक्तिस आभुषनाच्या रूपाने सुशोभित करतात. बुद्ध धर्मात पंचशील रत्न, भावना, ध्यान, चार आर्य सत्य, आर्य अष्टांगिक मार्ग इत्यादी रत्नाची माला जी व्यक्ती आपल्या आचरणात, व्यवहारात धारण करतो त्यांचे व्यक्तीत्व उजळवून जाते. सांसारिक बंधनातुन सुटून निर्वाण प्राप्ति करतो. ध्यान भावनेशी एकरुप होऊन निर्वाण प्राप्त करतो. ह्या प्रकारे बुद्ध धम्म

एक अविष्कार आहे, शोध आहे, बोध आहे, अद्भूत आहे, अप्रतिम आहे. बुद्ध धम्म मानविय जीवनाचे सखोल अध्ययन आहे. ज्या समाजात बुद्ध धम्म सार्वजनिक रुपाने आचरणात आहे सद् व्यवहार, सदाचार, एक दुसऱ्यांच्या प्रती प्रेमपुर्वक शील युक्त करुणामय व्यवहार, विश्वास आहे तो समाज स्वस्थ आहे तो समाज उत्तरोत्तर प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर आहे. समाजाला श्रेष्ठ बनविण्यास ह्या अद्भूत आठ गुणांना आपल्या आचरणात, व्यवहारात आणणे आवश्यक आहे. ह्यातच समाजाचे कल्याण आहे.

मराठी अनुवाद

**- शांतारामजी इंगळे**

# पालि सोसायटी ऑफ इंडिया
# पालि दिवस समारोह

## (पालिदिवसो) १ एप्रिल, २०२२
## एकदिवसीय अन्तर्राष्ट्रीय संगोष्ठी

**कार्यक्रम स्थळ** : म्यांमार बौद्ध मन्दिर, कुशीनगर, उत्तर प्रदेश,

**विषय** : बौद्ध धर्म में मैत्री एवं सद्भाव

**संरक्षक** : अग्गमहापण्डित भदन्त ज्ञानेश्वर महाथेरो, विहाराधिपति म्यांमार बौद्ध मन्दिर, कुशीनगर, उत्तरप्रदेश
डॉ. भिक्षु स्वरुपानन्द महाथेरो, अध्यक्ष - पालि सोसायटी ऑफ इंडिया, वाराणसी
डॉ. भिक्षु रमेश चन्द्र नेगी, उपाध्यक्ष - पालि सोसायटी ऑफ इंडिया, वाराणसी

**महासचिव** : प्रो. रमेश प्रसाद, अध्यक्ष - श्रमण विद्या संकाय, संपूर्णानन्द संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी

**सचिव** : डॉ. भिक्षु नन्दरतन थेरो, विहाराधिपति, श्रीलंका बुद्ध विहार, कुशीनगर

## सामनेर शिबीर

पालि रिसर्च इन्स्टिट्युट, मुंबई च्या वतीने बोधगयेत अखिल भारतीय भिक्खु संघाच्या विहारात पुज्य भन्ते प्रग्यादीप महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली १९ डिसेंबर, २०२१ ते १ जानेवारी, २०२२ या कालावधीत सामनेर शिबीराचे आयोजन करण्यात आले असून या शिबीरात जे उपासक भाग घेऊ इच्छितात त्यांनी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**अरविंद भंडारे**
भ्रमणध्वनी ९९६७६९२०१४

**शांतारामजी इंगळे**
भ्रमणध्वनी ९९६०७९६८२७

## धर्म (धम्म) आणि समाज

**उपासिका - आर. तुलि**

भगवान बुद्धांचा धर्म-शास्त्यांचा धर्म मानव जीवनाचे गहन अध्ययन आहे. देववाणी नाही. भगवान बुद्धांचा धर्म मानवीय अधिकारांवर जिवित राहणारा धर्म नाही. मानवीय अधिकारांवर जिवित राहणारा धर्म, धर्म नाही अंधविश्वास आहे.

भगवान बुद्धांच्या धर्मात अंधविश्वासाला स्थान नाही. धर्म प्राप्तीसाठी स्वत:ला प्रयत्न करावे लागतात. धर्म काही अशी वस्तु नाही जी हातोहात दिली जाऊ शकते. धर्माचा मार्ग दाखवला जाऊ शकतो. ज्ञान दिले जाऊ शकते परंतु ते आत्मसात करण्यासाठी क्रियात्मक प्रयत्न करावयास हवा.

आज मजहब किंवा धर्म व्यक्तिगत गोष्ट मानली जाते, सामाजिक नाही. लोकांची मान्यता आहे की धर्म किंवा मजहब व्यक्तिगत असावे सार्वजनिक नव्हे. परंतु धर्माला व्यक्तिगत रुपात न ठेवता सामाजिक रुपात ठेवणे अति आवश्यक आहे. मानव एकटा नाही, तर सर्व समाजाचे अंग आहे. अंतत: सर्वसमाजात धर्माची आवश्यकता आहे.

धर्म अर्थात सदव्यवहार, सदाचार. समाजात एक दुसऱ्यांप्रती चांगला व्यवहार, एकमेकांप्रती विश्वास असावयास हवा. आपण समाजात प्रत्येक क्षेत्रात एक दुसऱ्यांसह संबंधित आहोत. जेथे दोन व्यक्ति एकत्र राहतात तिथे धर्माची भावना असेल तर ते एकमेकांसह प्रेमपूर्वक चांगला व्यवहार करत शांतिपूर्वक राहतील.

धर्माशिवाय समाज मार्गक्रमण करुच शकत नाही. जिवनात सुख आणि शांतिने राहण्याकरिता समाजात धर्माचे सार्वजनिक रुपात असणे खूप आवश्यक आहे. जिथे धर्म नसेल तेथे एकमेकांप्रती संशय भाव कायम राहिल. संशय भावाचा अर्थ आहे, आपण एकमेकांवर विश्वास ठेऊ शकत नाही. अशा अवस्थेत आपण सहज भावाने कोणतेही काम करु शकत नाही जिथे सहजता नाही, तेथे एक दुसऱ्यांप्रती मित्रभाव असू शकत नाही. मैत्री भावनेसाठी धर्माचे असणे आवश्यक आहे. अंतत: धर्म वैयक्तिक नाही सार्वजनिक असणे अनिवार्य आहे. भगवान बुद्धांनी आपणास जे काही शिकवले ते मानवप्राणी समजून स्वानुभवातून व स्वत:साठी विशेष स्थान सुरक्षित ठेवले नाही. भगवान बुद्धांनी आपला उत्तराधिकारी देखील नेमला नाही. भगवान बुद्धांचे स्वत:चे स्थान होते, धर्माचे. भगवान बुद्धांना त्यांच्या शिष्यांनी विनंती केली की आपला उत्तराधिकारी नेमा, परंतु त्यांनी धम्मच धम्माचा उत्तराधिकारी आहे असे सांगितले. धर्माला त्याच्या तेजाने जिवंत राहिले पाहिजे कोणा मानवीय अधिकाराच्या बलाने नव्हे. कोणत्याही मानवीय अधिकारावर जिवंत असलेला धर्म, धर्म नाही अन्ध विश्वास आहे.

भगवान बुद्धांचा धर्म एक अविष्कार आहे. एक शोध आहे, मनुष्याने केलेला. भगवान बुद्धांचा धर्म मानवीय जिवनाचे गहन अध्ययन आहे.

भगवान बुद्धांच्या धम्मात अंधविश्वासाला स्थान नाही. धर्मप्राप्तीसाठी स्वत:ला प्रयत्न करावे लागतात. भगवान बुद्धांच्या अनुसार करुणा आणि प्रज्ञा धर्माचे दोन प्रधान तत्व आहेत. प्रज्ञा अर्थात निर्मल बुद्धि जेथे शुद्ध बुद्धि, मन असेल तेथे अंधविश्वासाला, मिथ्या विश्वासाला स्थान नाही. करुणेचा अर्थ आहे प्रेम, दया, मैत्री भाव याशिवाय समाज जिवंत राहू शकत नाही. तसेच प्रगति देशील करु शकत नाही.

याप्रकारे मजहब आणि धर्म यामध्ये इतकेच अंतर आहे की मजहब व्यक्तिगत गोष्ट आहे परंतु धर्म सामाजिक आहे. धर्माविना समाज जिवंत राहू शकत नाही. धर्माविना समाजात प्रगति व सुख शांती संभव नाही.

एकेकाळी भगवान बुद्ध मल्लांच्या अनुपिय नगरात विहार करत होते. एका सकाळी ते चिवर घालून, पात्र हातात घेऊन अनुपिय नगरात भिक्षाटनासाठी निघाले. मार्गात त्यांना असे वाटले की आता सकाळ आहे भिक्षेसाठी थोडा वेळ वाट पहावी असा विचार करुन तथागत भग्गव परिव्राजकाच्या आश्रमात गेले. भगवान बुद्धांना पाहून भग्गव परिव्राजक त्यांच्या स्वागतासाठी उठून उभा राहिला. त्यांना अभिवादन करुन सुसज्जित उच्च आसनावर बसवून स्वत: त्यांच्याजवळ खाली एका आसनावर बसला. याप्रकारे कुशलक्षेम विचारुन भग्गवने भगवंतास विचारले, 'हे श्रमण गौतमा काही दिवसांपूर्वी सुनक्खत लिच्छवी माझ्याजवळ आला व म्हणाला, की मी श्रमण गौतमाचे शिष्यत्व त्यागले आहे. त्याने जे सांगितले ते सत्य आहे का'?

'हो भग्गव असेच आहे', असे सुनक्खत लिच्छवी म्हणाला. तथागत पुढे म्हणाले, 'काही दिवसांपूर्वी सुनक्खत लिच्छवी माझ्याजवळ आला व म्हणाला मी तथागतांच्या शिष्यत्वाचा त्याग करतो. कारण तथागत सामान्य माणसांपेक्षा वेगळा काही चमत्कार दाखवत नाहीत. यावर मी त्यास म्हटले, सुनक्खत मी

तुला असे कधी सांगितले का, की ये माझा शिष्य बन, मी तुला सामान्य व्यक्तीपेक्षा वेगळा चमत्कार दाखवतो? नाही, भगवान, आपण असे म्हटले नाही, सुनक्खत म्हणाला.

मी त्यास म्हटले, सुनक्खत माझ्या धर्माचा उपदेश चमत्कार दाखविणे नाही माझ्या धर्माचा उद्द्देश आहे जो याचे आचरण करेल तो दु:खाचा नाश करेल.

सुनक्खत पुन्हा म्हणाला, भगवान, आपण सृष्टीचा आरंभ देखील सांगत नाही. यावर मी म्हणालो, सुनक्खत मी तुला केव्हा म्हणालो की ये माझा शिष्य बन मी तुला सृष्टीचा आरंभ सांगतो? सुनक्खत म्हणाला - नाही भगवान आपण असे म्हटले नाही.

मी त्यास म्हटले, सुनक्खत माझ्या धम्माचा उद्देश सृष्टीचा आरंभ सांगणे नव्हे, माझ्या धर्माचा उद्देश आहे, जो याचे आचरण करेल जो माझ्या धर्माला क्रियात्मक रुपाने स्वत: उतरवेल तो दु:खाचा नाश करु शकेल, मी म्हटले, सुनक्खत माझ्या धर्मात चमत्कार दाखविणे. सृष्टीचा आरंभ सांगणे याला महत्व नाही.

मजहब मध्ये आत्मा, परमात्मा, प्रार्थना, पूजा, कर्मकांड, रितीरिवाज, यज्ञ, कर्म, चमत्कार इत्यादींना महत्व आहे. धर्मात नैतिकतेला तेच महत्व आहे जे धर्मात ईश्वराला. धर्मात प्रार्थनेला, कर्मकांडाला, तीर्थ यात्रेला, रिती रिवाजांना कोणतेच स्थान नाही नैतिकताच धर्म आहे धर्मच नैतिकता आहे. नैतिकता धर्माचा स्तर आहे. मज्झिम निकाय मध्यम मार्ग नैतिकता आहे.

भगवान बुद्धांचे सारे दर्शन मज्झिम निकाय मध्यम मार्ग आहे. भगवान बुद्धांचे दर्शन आहे आर्य अष्टांगिक मार्ग सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक अजिविका, सम्यक कर्मान्त, सम्यक स्मृति, सम्यक व्यायाम व सम्यक समाधी हे आठ मार्ग आपणांस नैतिकतेकडे अग्रेसर करतात. यांच्या अनुसरणाने दु:खाचा अंत संभव आहे. यासोबतच सदाचरणासाठी भगवान बुद्ध पंचशील धारण करण्यास सांगतात.

1) प्राणी मात्राची हिंसा करु नये.
2) चोरी करु नये.
3) खोटे बोलू नये.
4) कामवासनेपासून विरत राहणे.
5) मद्यपान नशा करण्यापासून विरत राहणे.

या पांच शिलाच्या अभ्यासाने नैतिकता बाणवते व कुशल संस्कार होतात. याप्रकारे धम्मात जी नैतिकता आहे, त्यानुसार मनुष्याने मनुष्यासोबत मैत्री करणे.

नैतिकतेचा अर्थ आहे जे श्रेष्ठ आहे, जे समाजाच्या हिताचे आहे आणि ज्यात समाजाची प्रगती आहे. याप्रकारे भगवान बुद्धांचे म्हणणे आहे. धर्मच नैतिकता आहे नैतिकता धर्म आहे. ज्या समाजात नैतिकता सर्वोच्च आहे अर्थात ज्या समाजात आर्य अष्टांगिक मार्ग आणि पंचशीलाचे अनुसरण आहे तोच समाज प्रगती करतो. फळतो, फुलतो व आनंदी राहतो. जीवन संघर्ष आहे. मानवी मनात विरोधी भाव येतात. जिथे पार्टी बाजी आहे. दलबन्दी आहे तेथे मानवी मन भटकते आणि परिणामत: लढाई झगडे होतात त्या संघर्षात स्वार्थामुळे नैतिकता राहत नाही. अंतत: नैतिकता बाणवण्यासाठी आवश्यक आहे मैत्री भावना आपल्यात विकसित करणे. याप्रकारे भगवान बुद्ध म्हणाले जसे धर्म पवित्र आहे तसेच नैतिकता सुध्दा पवित्र आहे. समाजाला श्रेष्ठतम बनविण्याकरिता नैतिकता असणे आवश्यकता आहे. धर्म (धम्म) समाजाहून भिन्न नाही समाज धर्माहून भिन्न नाही.

मराठी अनुवाद
**– अरविंद भंडारे**

## धम्मचक्र

पालि भाषा, तिपिटक साहित्याच्या प्रचार आणि प्रसाराच्या उद्देशाने बुद्ध धम्म संघाला समर्पित, धम्मचक्राला गतीमान करण्याच्या हेतूने तसेच सामाजिक मुद्दयांवर समयानुसार होणाऱ्या घटनांची सत्य माहिती प्रस्तुत करण्याकरीता पाक्षिक धम्मचक्र पाठकांकरीता नियमित प्रस्तुत केले जात आहे.

- **शांतारामजी इंगळे,** संपादक धम्मचक्र

## बौद्ध महोत्सव

**सारनाथ महोत्सव**

कार्तिक पौर्णिमेच्या पवित्र दिनी पुज्य भदन्त सारीपुत्त (धम्मसेनापती) यांच्या परिनिर्वाण दिनानिमित्त या महोत्सवाचे आयोजन दरवर्षी सारनाथ येथे होते.

**सांची महोत्सव**

दरवर्षी नोव्हेंबरच्या शेवटच्या रविवारी सांची महोत्सवाचे आयोजन महाबोधी सोसायटी श्रीलंका व मध्यप्रदेश सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने होते. या महोत्सवात भगवान बुद्धांचे प्रमुख शिष्य सारिपुत्त आणि महामोगल्लान यांच्या पवित्र रक्षा धातुंचे मिरवणुक काढून अभिवादन केले जाते.

**सारु मारु महोत्सव**

प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यात मध्यप्रदेशच्या नसरुल्लागंज, सलकनपूर आणि भोपाळ येथील धम्म अनुयांयीद्वारा या महोत्सवाचे आयोजन केले जाते. येथे सम्राट अशोकांच्या शिलालेखांसह प्राचीन बौद्ध मठाचे अवशेष तसेच अश्मयुग काळातील काही अवशेष सापडतात.

**पालि रिसर्च इन्स्टिटट्यूट मुंबईतर्फे**

कालकथित **राजेंद्र जनार्दन साळवे** (वय ५१) यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**(११ ऑक्टोबर, २०२१)**

पालि रिसर्च इन्स्टिटयूट मुंबईचे सर्व सदस्य समस्त साळवे परिवाराच्या दु:खात सामिल आहोत.

# बोधगयेत परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूर्तीचे निर्माण कार्य



पालि रिसर्च इन्स्टिटय़ूट मुंबई च्या वतीने बोधगया येथे 14 एप्रिल, 2022 रोजी अखिल भारतिय भिक्खु संघाच्या विहारात परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चुनार दगडातील 7 फुट मूर्तीचे उद्घाटन होत आहे. आपणा सर्वांस विनंती आहे की, सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.

**कार्यक्रम स्थळ** :- अखिल भारतीय भिक्खू संघ विहार, बोधगया

**कार्यक्रमाची वेळ** :- 14 एप्रिल, 2022 वेळ, सकाळी 10 वाजता

**कार्यक्रमाचे अध्यक्ष** :- पूज्य भिक्खू प्रग्यादीप महाथेरो (सेक्रेटरी, अखिल भारतीय भिक्खू संघ)

**मूर्तीचे उद्घाटन** :- मा. तुषारजी मोहिते (आय. आर. एस.)

**पुस्तक प्रकाशन** :- मैत्री संपुर्ण धम्म आहे - उपासिका, वांग्मो डिक्से यांच्या हस्ते
चरियापिटक - मा. एन. दोरजे - सचिव - बी.टी. एम. सी.

**स्वागताध्यक्ष** :- मा. शांतारामजी इंगळे (सदस्य, पालि रिसर्च इन्स्टिटय़ूट मुंबई)

**संबोधन** :- मा. अरविंद भंडारे (अध्यक्ष, पालि रिसर्च इन्स्टिटय़ूट मुंबई)

**स्वागत समिती अध्यक्ष** :- मा. अरुण वाघमारे (सदस्य, पालि रिसर्च इन्स्टिटय़ूट मुंबई)

**सूत्रसंचालन** :- मा. नागसेनजी गमरे (सदस्य, पालि रिसर्च इन्स्टिटय़ूट मुंबई )

**स्वागत समिती** :- रामचंद्र सकपाळ, जगन्नाथ काळे, सुनील काळे, दिनेशकुमार पडवळ, सुमित तांबे, मेघा बनसोडे, शिला कंजे, अनिता रणदिवे, प्रवीण तायडे, चिंटूकुमार,

## पालि भाषेची विविध नावे

बुद्धवचनांची भाषा म्हणजे पालि भाषा परंतु पालि हा शब्द बुद्धवचनांमध्ये आढळत नाही. 19 व्या शतकापूर्वी बुद्धवचनांच्या या भाषेला मागधी असे म्हटले जात होते तसेच या भाषेला काही ग्रंथांमध्ये इतर नावानेही संबोधले गेले आहे.

1. **तन्ति -** तन्ति आरुहस्स बुद्धवचनस्स । **अर्थ** - तन्ति भाषेत आलेल्या बुद्धवचनांचे. ( पक्कट्ठानं वचनप्पबन्धानं आलि' ति पालि...टिका

2. **मागधि -** मागधिकाय निरुत्तिया । **अर्थ** - मागधि भाषेत (अट्ठसालिनी )

3. **भारती -** ताय भारतिभासाय, धम्मो याय पकासितो। **अर्थ -** त्या भारती भाषेत ज्यात बुद्धाचा धम्म प्रकाशित आहे. (पद्म विभावनी)

अनेक पालि भाषेचे विद्वान व तिपिटकाचे अभ्यासक यांच्या संशोधनानंतर 19 व्या शतकात या भाषेला पालि हे नामाभिधान प्राप्त झाले. उदा. पा पालेती वा रक्खति बुद्धवचनं ति पालि । **अर्थ** - जी बुद्धवचनांचे रक्षण करते ती पालि - आचार्य धर्मानंद कोसंबी.

तस्मातिह त्वं आनन्द । इमं धम्म परियायं अत्थ जालन्ति पि नं धारेहि । **अर्थ** - अर्थात आनंद, ह्या धम्मपरियायाला (धम्म उपदेशाला) अर्थजाल सुद्धा समज... अलौकिक संग्रामविजय सुद्धा समज. ( दिघनिकाय, ब्रह्मजाल सुत्त, पालि महाव्याकरण - भिक्खु जगदीश काश्यप )

(पालि भाषेच्या उत्पत्ती व प्रदेशासंबंधी अनेक विद्वानांची मते विस्तृत लेखाद्वारे प्रसिद्ध करू)

संदर्भ - पालि साहित्य का इतिहास - भिक्खु धर्मरक्षित, पालि महाव्याकरण - भिक्खु जगदीश काश्यप.

- **अरविंद भंडारे** पालि रिसर्च इन्स्टिट्यूट मुंबई 23/06/2019

## छान्दस

तथागतांच्या समयी काही ब्राह्मण कुळातून प्रवज्जित झालेल्या भिक्खुंना बुद्धवचनात संकर / भेसळ झालेली आवडत नसे. त्यांचे मत होते की बुद्धवचनांना छान्दस भाषेसारखे परिशुद्ध व प्रांजळ राखले पाहिजे. त्यांची अशी सुद्धा इच्छा होती की भगवान बुद्धांच्या सुत्तांना छान्दस म्हणजेच वैदिकांच्या भाषेत सूत्रबद्ध करून त्यांचे स्वाध्याय ब्राह्मणांसारखे केले पाहिजेत.

एक दिवस त्यांच्यातील यमेड आणि तेकुल नावाचे भिक्खु तथागतांकडे आले आणि त्यांना प्रणाम करून म्हणाले भन्ते, या समयी नाना नाम, गोत्र, जाति आणि कुळातून अनेक भिक्खु प्रवज्जित झाले आहेत. ते त्यांच्या स्वत:च्या भाषेत (सकाय निरुत्ति) बुद्ध वचनांना दूषित करत आहेत. जर बुद्ध वचनांना छान्दस भाषेसारखे नियमबद्ध केले तर योग्य होईल भन्ते असे आम्हांस वाटते.

तथागतांना ही गोष्ट आवडली नाही. त्यांनी त्या भिक्खुंना सांगितले हे उचित होणार नाही की धम्म सुत्तांचे पाठ वैदिक भाषेत होवो. भिक्खुंनो बुद्ध वचनांना छान्दस भाषेत करू नये जे करतील त्यांना दुष्कृत्याचा ( दुक्कट ) दोष लागेल.यात बुद्धांची इच्छा स्पष्ट दिसते की प्रत्येकांनी बुद्धवचन आपआपल्या भाषेत शिकावे.

तथागतांनी एक दिवस भिक्खुंना भाषेच्या बाबतीत संबोधित करताना म्हणाले, भिक्खूहो जनपदाच्या भाषेचा (जनपद निरुत्ति) आग्रह करू नये. तसेच नामांच्या मागे धावू नये कारण एखाद्या गोष्टीला काही जनपदात 'पाती' या नावाने ओळखले जाते तर त्याच गोष्टीला काही जनपदात पत्त, वित्त, सराव, धारोप, पोण, पिसीलव. त्यामुळे एखाद्या जनपदात एखाद्या गोष्टीला जसे ओळखले जाते तसे इतर जनपदात त्या गोष्टीला विना आग्रह त्यांच्या शब्दात ओळखले गेले पाहिजे/संबोधले गेले पाहिजे.

## भावपूर्ण श्रद्धांजली

पालि रिसर्च इन्स्टिट्यूट मुंबई च्या वतीने दरवर्षी धम्म स्थळांची अज्झयन चारिका आयोजित करण्यात येते. गेल्या दोन वर्षांपासून चालु असलेल्या कोरोना महामारीत आमचे काही श्रद्धावान उपासक 2021 च्या कोरोनाच्या लाटेत निधन पावले त्या सर्वांप्रती दु:खद संवेदना व्यक्त करत विश्वास सरोदे, अशोक बनसोडे, मिलींद विधाते, सिद्धार्थ हिरे या सर्व कालकथित उपासकांना संस्थेतर्फे भावपूर्णश्रद्धांजली ! या सर्व परिवारांच्या दु:खामध्ये पालि रिसर्च इन्स्टिट्यूट मुंबई सामील आहे.

छान्दस (वैदिक) भाषा आर्यकुळातील सवार्धिक प्राचीन भाषा आहे. पालि, प्राकृत, संस्कृत, अर्धमागधी या भाषांची जननी छान्दस भाषा आहे असे भिक्खु धर्मरक्षित व भिक्खु जगदीश काश्यप यांचे मत आहे. ज्या समयी छान्दस भाषेचे व्यवहार प्रचलित होते व ती ग्रंथारूढ होत होती त्या समयी लोकभाषेत त्याचे प्राकृत रूप सुद्धा अस्तित्वात होते. प्राकृतात व्याकरण संबंधी स्वतंत्रता होती. पुढे पाणिनीने त्याला व्याकरणाची जोड देऊन व्याकरणात बंदिस्त केली तिलाच आज आपण संस्कृत म्हणतो. आणि छान्दस चे जे प्राकृत रूप चालत राहिले त्याला पालि या नावाने आज आपण संबोधतो. त्यामुळे छान्दसचे बरेचसे रूप आपल्याला पालित जसेच्या तसे मिळतात जे संस्कृतात मिळत नाहीत. म्हणून छान्दस या भाषेला सर्वात जवळची भाषा पालि आहे. पुढे काही काळाने अर्धमागधी, शौरसेनी, पैशाची या प्राकृत भाषांची निर्मिती झाली ज्यांचा थेट संबंध पालिशी आहे.


छान्दस मधील 2/3 शब्द आपल्याला पालित उतरलेले दिसतात तर 1/3 शब्द तत्कालीन भारतीय भाषांतून आलेले दिसतात ह्याच कारणांमुळे आजसुद्धा पालि ही भारतातील सर्व भाषांच्या जवळ आहे. **संदर्भ** - पालि साहित्य का इतिहास - भिक्खु धर्मरक्षित, पालि महाव्याकरण - भिक्खु जगदीश काश्यप.

**- अरविंद भंडारे,**
पालि रिसर्च इन्स्टिटयूट, मुंबई 24/06/2019


## भेसज्जगुरू - भगवान बुद्ध

शरीराला झालेल्या व्याधींना आपण कसे दूर करू शकतो हे एक वैद्य आपणांस सांगू शकतात. आपल्या मनासंदर्भातील (मानसिक) होणाऱ्या व्याधींना आपण कसे दूर करू शकतो हे आपणांस एक मानसतज्ञ सांगू शकतो. परंतु या सर्व विकारावर आपण कसे मात करू शकतो किंवा त्याचा निरोध कसा करू शकतो हे बुद्ध आपणांस सांगतात. भगवान बुद्ध हे आयुर्वेदाचे किती जाणकार होते याची उदाहरणे आपणाला विनयपिटकाच्या महावग्गातील भेसज्ज स्कन्धात सापडतात. त्यामध्ये भिक्खूंना होणारे अनेक आजार व त्यावर बुद्धांनी कोणत्या चिकित्सा सांगितल्या हे पहावयास मिळते. उदा. 1. लवण चिकित्सा 2. रक्तात्पता 3. खाज Ringworm 4. नेत्ररोगाची चिकित्सा 5. औषधात चरबीचा वापर 6. औषधी वनस्पती मूळ 7. औषधी अर्क 8. औषधी डिंक 9. त्वचा रोग 10. नस्य चिकित्सा 11. काविळ चिकित्सा 12. पोटातील वायुगोळा 13. औषधात मद्याचा वापर व त्याचा हेतू 14. लसून चिकित्सा 15. शल्य चिकित्सा 16. स्वेदन कर्म 17. सर्पदंशावर चिकित्सा 18. औषधी गूळ 19. औषधी पेय्य 20. फळरस. मनाचे (मानसिक) विकार हे अविद्या व तृष्णेमुळे उद्भवतात. आर्य अष्टांगिक मार्गाचा अवलंब केल्याने या विकारांचे निरसण कसे होते. हे भगवान बुद्धांनी सांगितले आहे. शारिरिक विकार व मानसिक विकार यावरच बुद्ध थांबले नसून त्यांनी धम्माची स्थापना करून सामाजिक विकार (वर्ण व्यवस्था, जाति व्यवस्था) सुध्दा नष्ट करण्याचा मार्ग सांगितला. यामुळेच भगवान बुद्धांना भेसज्ज गुरू असे म्हटले जाते.पूर्वी गांधार नावाच्या देशात एका भयानक रोगाने पछाडलेला एक वृध्द भिक्खू होता. तो ज्या ज्या ठिकाणी उठत अथवा बसत असे ती जागा मलिन होई.तो गांधार देशातील एका विहारात राहात असे. कोणीही त्याच्याजवळ जात नसे किंवा संकटात सहाय्य करत नसे. एकदा भगवान बुद्ध भिक्खू संघासह तेथे गेले. त्या जागेला एवढी दुर्गंधी येत होती, की त्या सर्व भिक्खूंना त्या भिक्खूची घृणा वाटू लागली. परंतु बुध्दाने शुक्रदेवाला गरम पाणी आणून ओतायवयास लावून स्वताच्या हाताने त्या भिक्खूचे शरीर स्वच्छ केले. तेव्हा तिथे उपस्थित असणाऱ्या राजा, नागलोक, देवलोक यांनी तथागतांना विचारले. इतक्या थोर, उदात्त महापुरूषाने असले घाणेरडे काम का करावे? यावर तथागतांनी आपल्या कृतीचे असे स्पष्टिकरण केले. **या जगात जे गरिब आहेत, असहाय्य आणि अनाथ आहेत त्यांचा तथागत मित्र आहे. शारिरिक व्याधींनी पछाडलेले आहेत, मग ते श्रमण असोत किंवा इतर कोणीही असोत त्यांची सेवा करण्यासाठी, जे दरिद्री, अरक्षित आणि वृध्द आहेत त्यांना सहाय्य करण्यासाठी आणि इतरांना आपल्या सारखेच करायला प्रेरणा देण्यासाठी तथागताचा जन्म आहे.** (बुद्ध आणि त्यांचा धम्म खंड 3 भाग 5 ) संपूर्ण जगात आज असे समजले जाते की रूग्णांची सेवा ही येशूच्या सेवेपासून सर्व जगात पसरली परंतु त्याही आधी तथागत बुद्धांनी रूग्ण सेवा केल्याची उदाहरणे व रूग्ण सेवा करण्याचा आदेश विनय पिटकाच्या महावग्गातील भेसज्ज स्कन्धात सापडतो.


**- अरविंद भंडारे**
पालि रिसर्च इन्स्टिटयूट मुंबई 24 जून 2018





किंमत रु. १००/-





किंमत रु. १००/-




मोफत वितरण





किंमत रु. ५०/-





किंमत रु. २००/-




किंमत रु. १००/-





किंमत रु. २००/-





किंमत रु. ५५०/-




किंमत रु. ५०/-





किंमत रु. १५०/-




किंमत रु. २२५/-







किंमत रु. ६०/-




किंमत रु. १००/-




किंमत रु. २००/-